शुक्रवार, २४ नोव्हेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १०६
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 24 NOV. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-106 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

## ज्ञानेश्वरामुळे वाचली पांडुरंगाची मोसंबी, दोन एकरात ४५ टनांची शाश्वती!

### २ एकर मोसंबी बाग, ३२० झाडांपासून ३० लाखांचे उत्पन्न अपेक्षित

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** गेल्या तीन वर्षांपूर्वी अतिवृष्टीच्या तडाख्यात सापडलेल्या फळबागा कित्येक शेतकऱ्यांनी मोडुन टाकल्या. तीच वेळ पैठण तालुक्यातील कातपूरच्या पांडुरंग मोरे यांच्यावर आली. मात्र योग्यवेळी कृषी सल्लागार तथा जय जनार्दन कृषीचे संचालक ज्ञानेश्वर उगले यांचे मार्गदर्शन मिळाले आणि पांडुरंगाची मोसंबी आज उच्च उत्पादन करणार असल्याने पांडुरंगाला ज्ञानेश्वराचे मार्गदर्शन मिळाले, असेच म्हणावे लागेल. तीन वर्षानंतर यंदा मोसंबी बागायतदार समाधानी असल्याचे चित्र तालुक्यात असून किमान दहा लाख ते 75 लाखापर्यंत मोसंबीला दर्जा व फळाच्या संख्येत दर मिळत आहे. मात्र ज्ञानेश्वर उगले यांचे योग्य मार्गदर्शन तसेच शेतकरी पांडुरंग मोरे यांचे व्यवस्थापन आणि त्याला त्यांच्या निचऱ्याच्या जमिनीने दिलेली साथ यामुळे दोन एकरात त्यांना ४५ टन मोसंबीचे उत्पादन मिळत आहे. बाजारपेठेत या दर्जेदार मोसंबीला मोठी मागणी आहे.



एकदा मोसंबी लावली व वर्षातून एकदा खते दिली, की पाणी देणे एवढेच काम बाकी राहते, असा काही मोसंबी शेतकऱ्यांचा समज असतो . मात्र त्यावेळी उत्पादनही जेमतेमच निघत असते, ही बाब मोरे यांनी चांगली समजून घेतली .तीन वर्षांपूर्वी अतिवृष्टीचा तडाखा बसला आणि मोसंबीची झाडे काढून टाकायचे ठरले, परंतु योग्यवेळी जय जनार्धनचे संचालक ज्ञानेश्वर उगले यांचे मार्गदर्शन मिळाल्याने आज आमची मोसंबी वाचली . त्यांनी मोसंबीसाठी विशेष लक्ष देऊ लागले . शेणखत वा सेंद्रिय खताची कमतरता काही प्रमाणात निंबोळी खतातून भरून काढली . सूक्ष्म अन्नद्रव्ये फवारणी तसेच जमिनीतूनही दिली . रासायनिक खताच्या मात्रा दर वर्षी टप्प्याटप्प्याने वाढविल्या . कीड व रोगनाशकांच्या फवारण्याही सुरुवातीपासून केल्या . त्यामुळे आज दोन एकरातील 320 झाडाला भरपूर माल लागला असून किमान 45 टन माल व 30 लाखांचे उत्पन्न मिळण्याची शास्वती वाटते . **ज्ञानेश्वर उगले, जय जनार्धन( संचालक) पैठण**

## दुर्दैवाने आपणच मातृभाषांबाबत उदासीन

### राज्यपाल रमेश बैस : अभिनेते, अभिनेत्री नेहमी इंग्रजीतच बोलतात



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : राज्यपाल म्हणून अनेक देशांचे राजदूत व वाणिज्यदूत मला भेटायला येतात. त्यातील काहींना तर हिंदी भाषादेखील अवगत असते. अनेक देशांमधील विद्यापीठांमध्ये हिंदी भाषा विभाग कार्यरत असल्याचे त्यांच्याकडून समजते. दुर्दैवाने आपणच आपल्या मातृभाषांबाबत उदासीन आहोत. हिंदी चित्रपटातील अभिनेते, अभिनेत्री नेहमी इंग्रजीतच बोलतात; हिंदी भाषेत बोलण्यास कचरतात, हे दुर्दैवी आहे, अशी खंत राज्यपाल रमेश बैस यांनी व्यक्त केली.**

गृह मंत्रालयाच्या राजभाषा विभागातर्फे आयोजित क्षेत्रीय राजभाषा संमेलनाचे उद्घाटन राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते पार पडले. न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, अणुशक्ती भवन तुर्भे (मुंबई) येथे गुरुवारी हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. राज्यपालांच्या हस्ते विविध केंद्रीय संघटना, बँक आणि उपक्रमांना २०२२-२३ वर्षाचे क्षेत्रीय राजभाषा पुरस्कार प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाला केंद्रीय गृह राज्यमंत्री अजय कुमार मिश्रा, राजभाषा विभागातील सचिव अंशुली आर्य, राजभाषा सहसचिव डॉ. मीनाक्षी जौली, न्यूक्लियर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक भुवन चंद्र पाठक तसेच राजभाषा विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच इतर निमंत्रित उपस्थित होते. पुढे बोलताना रमेश बैस म्हणाले की, अनेक इंग्रजी माध्यमांच्या शाळा आपल्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना घरी देखील इंग्रजीतूनच संवाद करण्याचे सांगतात. हिंदी किंवा मराठी भाषेत बोलणाऱ्याकडे हीन दृष्टीने पाहिले जाते. परिणामतः मुले आपल्या मातृभाषेत किंवा हिंदीत बोलण्यास कचरतात. जगात भारत एकमात्र देश आहे जिथे आपलीच राष्ट्रभाषा वाचवण्यासाठी समिती नेमावी लागते. इस्त्रायलने हिब्रू भाषा जीवित करुन तिला मातृभाषा बनवले. परंतु, आपल्याकडे स्वातंत्र्यानंतर ७६ वर्षांनीदेखील हिंदी ही राष्ट्रभाषा न होता राज्यभाषाच राहिली आहे. हिंदी भाषा येत नसेल तर त्याचा लोकांना न्यूनगंड येत नाही, परंतु इंग्रजी भाषा येत नसेल तर न्यूनगंड दिसून येतो असे सांगून देशांतर्गत विमान प्रवासात हिंदीचा वापर का केला जात नाही? याबद्दल रमेश बैस यांनी आश्चर्य व्यक्त केले. लॉर्ड मेकॉले यांनी देशावर थोपलेली वैचारिक गुलामगिरी जावी आणि हिंदी भाषा लोकभाषा व्हावी यासाठी हिंदी भाषेत इंग्रजीला पर्यायी असे सोपे शब्द उपलब्ध करून द्यावे अशी सूचनाही राज्यपालांनी यावेळी केली.

**भाषा ही राष्ट्राचा आत्मा असते : राज्यपाल**

राज्यपाल म्हणाले, भाषा हा कोणत्याही राष्ट्राचा आणि समाजाचा आत्मा असतो, त्यातून तो देश संवाद साधतो आणि आपल्या भावना व्यक्त करतो . आचार्य विनोबा भावे यांनी आपल्या भूदान चळवळीच्या यशाचे श्रेय हिंदीला दिले होते . महात्मा गांधींनी ' हिंदुस्थानी ' भाषेला सर्वोच्च स्थान दिले, असे सांगून जोपर्यंत लोक आपल्या मातृभाषेत विचार व्यक्त करीत नाहीत, तोवर कोणत्याही देशात स्वतंत्र विचारसरणीचा विकास शक्य होत नाही . भारतात बोलल्या जाणाऱ्या सर्व भाषा या ' राष्ट्रीय भाषा 'च आहेत . भाषांमध्ये कोणताही संघर्ष नाही, तर त्या परस्परांना पूरक आहेत . सध्याच्या युगात प्रगतीसाठी तांत्रिक, वैज्ञानिक, व्यावसायिक आणि विविध विषयांचे अद्ययावत ज्ञान आवश्यक आहे . त्यासाठी भारतीय भाषांमधील उच्च दर्जाच्या लेखनाला तसेच भाषांतराला प्रोत्साहन द्यावे लागेल .राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात प्रादेशिक भाषांमध्ये शिक्षण देण्यावर भर देण्यात आला आहे . भाषेचा सर्वोत्तम विकास आणि प्रसार उत्स्फूर्तपणे आणि स्वेच्छेने होतो . त्यामुळे सर्वांनी स्वेच्छेने मातृभाषेला प्राधान्य द्यावे .

### महत्त्वाची बातमी

## 31 डिसेंबरला शिंदे सरकार पडणार : आदित्य

आधुनिक केसरी न्यूज

**सावंतवाडी :** राज्याचे माजी पर्यटन मंत्री आणि ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारबाबत मोठं विधान केले आहे. येत्या 31 तारखेपर्यंत किंवा त्या आधी विधानसभा अध्यक्षांनी निकाल द्यायला हवा. तसेही या सरकारला जास्त दिवस राहिले नाहीत. 31 डिसेंबरला हे सरकार पडणार म्हणजे पडणार आहे. 2024ला देशात आणि महाराष्ट्रात नवीन सरकार बसणार आहे, असा मोठा दावा आदित्य ठाकरे यांनी केला आहे. आदित्य ठाकरे कोकणाच्या दौऱ्यावर आहेत. सावंतवाडीत खळा बैठकीनंतर त्यांनी हे मोठे विधान केले आहे. मुंबई महापालिकेने मुंबईतील डिलाईल रोड येथील पूलाचे लोकार्पण केले. याबाबत आदित्य ठाकरे यांना विचारण्यात आले असता त्यांनी महापालिकेवर जोरदार टीका केली. 31 तारखेपर्यंतच खोके सरकार टिकणार आहे, हे मला महापालिकेला सांगायचे आहे. मी बाहेर पडण्याची पालिका वाट बघत होते तर आधीच सांगायचे होते. मी आधीच कोकणात दौरा करायला आलो असतो. यांनी डिलाईल रोडचे डिले रोड केले आहे. आम्ही जनहितासाठी रस्ता उघडला आहे. पण आमच्यावर केसेस टाकल्या. तरीही दहा दिवसासाठी रस्ता बंद केला आहे. बिल्डर मंत्री आहे. दुसरेही एक मंत्री आहेत. त्यांनी पालिकेत अतिक्रमण केले आहे. त्यांना मिळाला म्हणून त्यांनी उद्घाटन केले. आता मुंबई ट्रान्सहर्बर लिंकचेही उद्घाटन झाले पाहिजे. डिसेंबर अखेरपर्यंत थांबू नये, असे आदित्य ठाकरे म्हणाले. यावेळी आदित्य ठाकरे यांनी खळा बैठकीवरही भाष्य केले.

## धर्माबादच्या तिखटाला अरब राष्ट्रात मोठी मागणी

### मिरची उद्योगामुळे हजारो स्थानिक नागरिकांना मिळतोय रोजगार

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**


**धर्माबाद :** तालुका हे महाराष्ट्र- तेलंगणा राज्याच्या सीमेवर असल्याने दोन्हीही राज्यांचा संबंध आर्थिक व्यवहारच नसून तेलंगणा राज्याशी रोटी-बेटीचे संबंध जोडलेले आहेत. धर्माबाद शहर हे मिरचीचे मोठे आगार असून मिरचीसह हळद आणि धने पावडरसाठी प्रसिद्ध बाजारपेठ आहे. येथील कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत व्यवहार चालविले जाते. या बाजार समितीत मोठ्या प्रमाणात मिरचीची आवक वरच्यावर वाढत राहिल्याने धर्माबादची मिरची बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध आहे. बाजार समिती आवारात लाखो रुपयांची मिरचीची आर्थिक उलाढाल होते. धर्माबाद तालुक्यात मिरची लागवडीचे क्षेत्र कमी असले तरी लगतच्या तेलंगणा आंध्रप्रदेश व कर्नाटक राज्यातून मिरचीची मोठ्या प्रमाणात आवक बाजार समितीत होते. या ठिकाणी धर्माबादसह हैदराबाद, खम्मम, वरंगल, ब्याडगी (कर्नाटक)



, सोलापूर, गुलबर्गा या ठिकाणांवरून मिरची विक्रीसाठी येते. ग्राहक देखील मिरची खरेदी करण्यासाठी मोठ्या संख्येनं या ठिकाणी येतात. तसेच धर्माबादची गावरानी आणि तेजा या प्रसिध्द मिरच्या असून त्यांना अधिक मागणी असते. गुंटुर, सी-फाईव्ह, सी-झेंडा, बँडगी, टु सेव्हन थ्री, एसटेन, सीएस, डीडी,सु वर्णा या विविध नमुने नावाची लाल मिरचीचे ही विविध प्रकार असून वेगवेगळ्या प्रकारच्या जातीच्या मिरची धर्माबादच्या बाजार समितीत येतात. यानंतर धर्माबाद शहरातच लाल मिरचीची पावडर तयार करून महाराष्ट्र कर्नाटक आंध्रप्रदेश तेलंगणा राज्यासह विदेशातही पाठवली जाते.

धर्माबाद शहरात लाल मिरची पावडर बनवण्यासाठी मोठी औद्योगिक वसाहत आहे. या औद्योगिक वसाहतीत तिखट लाल मिरची पावडर म्हणली की धर्माबादच्या तिखट मिरचीची आठवण येते. या औद्योगिक वसाहतीत एकुण १५ मिरची कांडप असून तिथे पावडर बनविले जाते. या भागात मिरची लागवडीचे उत्पादन क्षेत्र कमी असून लगतच्या तेलंगणा, आंध्रप्रदेश,कर्नाटक भागातुन मिरचीची आयात करून येथील व्यापारी धर्माबादेत पावडर करून विकतात हे विशेष आहे. मिरची तेलगंणाची, पावडर मात्र धर्माबादची. मिरचीच्या देठ काढण्यापासून ते मिरची पावडरची पॅकिंग करण्यापर्यंतच्या उद्योगात शहरातील १००० लोकांना यामुळे रोजगार मिळत आहे. येथील मिरची पावडर घेण्यासाठी निझामाबाद, हैद्राबाद, कामारेड्डी, म्हैसा, बोधन, साठापूर, नंदीपेट, बासरी, मुधोळ आदी परिसरातून व नांदेड जिल्ह्यातीलच नसून महाराष्ट्रातील विविध तालुक्यातील नागरिक, महिला धर्माबाद शहरात येतात. मिरचीचे यावर्षीचे दर १०० ते २२० रुपये किलो प्रमाणे तर मिरची पावडर २६० ते २८० रुपयांपर्यंत एक किलो प्रमाणे विकली जात आहे. धर्माबाद शहर हे मिरचीसाठी प्रसिद्ध असलेले शहर म्हणून नावलौकिक मिळविला आहे. या भागात मिरची लागवडीचे उत्पादन क्षेत्र कमी असले तरी या भागातील शेतकऱ्यांना शासनाकडून विविध योजनेद्वारे मिरची लागवडीसाठी प्रोत्साहन देण्याबरोबरच परिसरात मिरची संशोधन केंद्र उभारणी केल्यास शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होईल तसेच शेतकरी मिरची लागवडीकडे वळतील अशी अपेक्षा शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे. धर्माबाद शहरात महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा राज्यातील मोठ्या प्रमाणात ग्राहक मिरची खरेदीसाठी येतात.

**तेजा मिरचीला अधिक मागणी :** धर्माबाद च्या प्रसिद्ध मिरची बाजारपेठेत तेजा मिरचीला अधिक मागणी असून, या मिरचीपासून तेल तयार करण्यात येते . तेलंगणातील खंम्मम येथे याची फॅक्ट्री आहे . त्यामुळे बाहेर पाठवण्यावर भर दिला जात आहे .धर्माबाद येथे १९८४ साली मिरची पावडर बनविण्यासाठी मिरची कांडप सुरू केले .यानंतर दिवसेंदिवस यात प्रगती होय .मिरची पावडरची पॅकींगही इथेच करण्यात येत असुन डी .एम .एच .या नावाने मिरची पावडरही बनवून देश-विदेशात पाठविण्यात येते, असे धर्माबाद येथील मिरचीचे व्यापारी तथा औद्योगिक वसाहतीचे चेअरमन शेख अमिरोददीन यांनी सांगितले .





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

तिथे तुला छान झोपता येईल. मी आता तुला तुझा आयपॅड ही परत करते आहे. ' यावर मुलगा म्हणतो, ' मॉम, मी आता इथेच राहू इच्छितो. आता मला आयपॅडही नको आहे. मला माझ्याजवळ असणाऱ्या गोष्टींची किंमत कळली आहे. ' आईच्या डोळ्यात अश्रू उभे राहतात. ती त्याला प्रेमाने जवळ घेते. इथे व्हिडीओ संपतो. पण सुरु होतो तो आपल्या विचारशक्तीचा प्रवास. ही कथा आपल्याला अंतर्मुख करते.

हा मुलगा आजच्या पिढीतील तरुण मुलांचे प्रतिनिधित्व करतो. अशा या मुलांना खाण्याच्या, मोबाईलच्या आणि इतरही अनेक गोष्टींच्या वाईट सवयीतून बाहेर कसं काढायचं हा सगळ्याच पालकांसमोर यक्ष प्रश्न आहे. ही मुलं मनानं वाईट नाहीत. फक्त ती वाईट सवयींना बळी पडली आहेत. इंग्रजीत सांगायचं तर ॲडिक्ट झाली आहेत. मोबाईल, आयपॅड सारख्या गोष्टींनी त्यांना एकलकोंडे बनवले आहे. त्यातून बाहेर यायची त्यांची इच्छा नाही. पण आपल्याला हातपाय गाळून चालणार नाही. आपली भावी पिढी सक्षम व्हायची असेल तर त्यांना त्यातून बाहेर काढावेच लागेल. आज आपण उठसूट इम्युनिटी म्हणजे प्रतिकारशक्ती वाढवा असे म्हणतो. इम्युनिटी हा परवलीचा शब्द झाला आहे. मुलं या सगळ्या गोष्टींबरोबर मानसिक दृष्ट्या देखील अपंग होत चालली आहेत. इम्युनिटी फक्त शारीरिकच असते असे नाही. ही इम्युनिटी मानसिक स्तरावरही वाढवायला हवी. या मुलांना मानसिक दृष्ट्या देखील सक्षम करायला हवे. त्यासाठी घर आणि शाळा या दोन्ही स्तरांवर प्रयत्न व्हायला हवेत. या व्हिडिओतली आई मुलाला मारत नाही, रागावत नाही. तिची समजावण्याची पद्धतच वेगळी आहे. ही अप्रत्यक्ष शिकवण खूपच प्रभावी ठरते. बाहेरची परिस्थिती कधी कधी खूपच निराश करणारी असते. अधूनमधून पडणारा अवकाळी पाऊस, सतत वाढणारे पेट्रोल डिझेलचे दर, सतत वाढणारी महागाई, करोना संपला असे वाटत असतानाच नवीन आलेला व्हेरियंट, राजकीय नेत्यांची बेफिकिरी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांबद्दल असलेली उदासीनता, एस टी चा संप, या सगळ्यामुळे होणारी सामान्य माणसाची घुसमट. पण आकाशात काळे ढग दाटून आलेले असताना ढगांचा पडदा बाजूला सारून मधूनच सूर्यदर्शन होते. तेजोनिधीची सहस्त्र किरणे आसमंत उजळून टाकतात.



## आनंदी पहाट


## जीवन एक प्रवास आहे, गंतव्य नाही

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

जीवन हा एक प्रवास आहे, गंतव्यस्थान नाही याचा अर्थ तयार करणे, मुळात असणे, तो शोधणे आणि त्यासाठी नियोजन करणे, काही विचार सोडणे, परिणाम निर्माण करणे आणि आवश्यक प्रक्रियांमधून जाणे यामधील निरोगी संतुलन म्हणून केले जाऊ शकते. आपला समाज उत्पादन, माहिती, प्रवास इत्यादींच्या गतीने आपल्याला हे शिकवतो की डोळ्याच्या पापण्या लावण्याला लागणाऱ्या अवधीत काहीही मिळवणे शक्य आहे. त्यामुळे एखादी गोष्ट मिळवायला खूप वेळ लागतो तेव्हा आपण अधीर, उदास होतो. आपण आपल्या आजूबाजूला पहायला विसरतो. एक मैत्रीपूर्ण भेट, एक असहाय सहकारी, औदार्याची प्रेरणादायी कृती; ह्या सर्व छोट्या छोट्या गोष्टी ज्या आपल्या आयुष्याला साहसी स्पर्श देऊ शकतात आणि आपण त्याकरिता खुल्या मानाने स्वीकार करत असल्यास आपला मार्ग आपण समृद्ध करू शकतो. आपल्या स्वतःच्या प्रवासाला आकार देण्याचे आपल्याला खूप स्वातंत्र्य आहे. अर्थात, याचा अर्थ असा आहे की ते जबाबदाऱ्या सोबत आणते आणि आपण परवानगी दिली तर आनंद देखील प्राप्त होऊ शकतो. आपण धारण केलेल्या वेगवेगळ्या भूमिकांमध्ये जसे पालक, बॉस, क्रीडा प्रशिक्षक, भावंड, कर्मचारी इ., आपण अपरिहार्यपणे त्यांच्या प्रवासात आपल्या सभोवतालच्या लोकांना पाठिंबा देतो आणि प्रभावित करतो. तरीही आपल्या वाटेवर राहणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी दुसऱ्याचा प्रवास निश्चित करण्याचा मोह टाळावा. जर आपल्याला विश्वास असेल की तेच आपल्या आनंदाचे गंतव्यस्थान आहे; जर आपल्यापैकी प्रत्येकाने आपल्या जीवनाचा प्रवास सामायिक केला असेल, तर आपल्या सर्वांचे वेगवेगळे संदर्भ बिंदू असतील कारण आपण सर्वांनी वेगवेगळे अनुभव घेतलेले असतात. त्यामुळे एका गंतव्यस्थानावरून दुसऱ्या ठिकाणी जाण्याची घाई करण्याची गरज नाही.



आधुनिक केसरी

## भक्तास ह्या तारी | माय अंबे ||

जागराला आलो | तुझ्या अंबाबाई ||
गोंधळाची | घाई मना लागे ||१||
उदो उदो अंबे | मंत्र संजीवन ||
परडीत धन | पुण्याईचे ||२||
कवड्याची माळ | लाभले वैभव ||
विकारी दानव | थरारले ||३||
नाचविता पोत | आनंदले मन ||
पाशाचे बंधन | मुक्त झाले ||४||
होऊनी निस्संग | आलो तुझ्या दारी ||
भक्तास ह्या | तारी माय अंबे ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

तुम्हीं माझिया जिवांतील जीव ।म्हणौनी अत्यंत लाघव ।
दाऊनियां चित्त सर्व ।हिरोन घेतलें ॥४६॥
मैद सोइरीक काढिती ।फांसे घालून प्राण घेती ।
तैसें आयुष्य गेलियां अंतीं ।प्राणीयांस होये ॥४७॥
प्रीति कामिनीसीं लागली ।जरी तयेसी कोणी रागेजली ।
तरी परम क्षिती वाटली ।मानसीं गुप्तरूपें ॥४८॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

उत्तम जीवन जगत में, है अधार सत्संग ।
अपने सत्य करतब्य का, द्योतक परश सुरंग ।।५३।।(स्वर्वेद पंचम मण्डल पंचम अध्याय) ०५/०५/५३

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
जगात जीवन उत्तम बनविण्याचा आधार सत्संग आहे. आपले सत्य कर्तव्य दाखवणारा प्रकाशक सत्संग आहे, ज्याच्या स्पर्शाने जीवन सुवर्णासमान प्रदिप्त होऊन जाते.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.


## समर्थ रामदास



हे समर्थांनी अनेक स्थळी सांगितले आहे. अनेक उपनिषदांचा संदर्भ देऊन समर्थांनी या जगाचे अनित्यत्व, मिथ्यत्व प्रतिपादन केले आहे. कर्म, भक्ती, ज्ञान या मार्गांचे अनुसरण करून मुक्त होण्याचे सर्वोच्च लक्ष्य त्यांनी त्यांच्या शिष्यांपुढे ठेवले. सतत ईश्वरचिंतन करावे, सद्गुरूंची सेवा करावी, उपासनेला प्राणपणाने चालवावे, सतत परमार्थ ग्रंथांचे परिशीलन करावे असे अनेक दंडक समर्थांनी घालून दिले आहेत. मध्यम उंची, मजबूत बांधा, गौर वर्ण, तेजस्वी कांति, कपाळावर लहानसे टेंगूळ, असे समर्थांचे स्वरूप होते. कमरेस लंगोटी, किंवा कधी कफनी, पायांत खडावा. लांब दाढी, जटा, गळ्यांत जपाची माळ, यज्ञोपवीत, हातांत कुबडी, काखेस झोळी, अशा थाटात समर्थांची रुबाबदार आणि दुसऱ्यावर छाप पाडणारी मूर्ती संचार करीत असे.

## लोभाच्या चित्तीं धन । तैसें राखावें अनुसंधान ॥

आधुनिक केसरी



मंगलांत मंगल, शुद्धांत शुद्ध जाण ।एक परमात्म्याचें अनुसंधान ॥ हें बीज लावलें ज्यांनीं । धन्य धन्य झाले जनीं ॥ अचूक प्रयत्न तोच जाण ।ज्या प्रयत्नांत न चुकतें अनुसंधान ॥ सत्य करावें भगवंताचें अनुसंधान ।जेणें दूर होईल मीपण ॥ ' मी माझें ' म्हणून सर्व कांहीं करीत जावें ।परि भगवंतापासून चित्त दूर न करावें ॥ मारुतिरायाचें घ्यावें दर्शन ।त्याच्याच कृपेनें राखावें अनुसंधान ॥ लोभ्याचे चित्तीं धन ।तैसें राखावें अनुसंधान ॥ दूर गेला प्राणी । परत येण्याची वेळ ठेवी मनीं ।तैसें राहणें आहे जगांत ।मी परमात्म्याचा होण्याचा ठेवावा हेत ॥ म्हणून न सोडावें अनुसंधान ।कशापेक्षांही जास्ती करावें जतन ॥ कोणाचेंच न दुखवावे अंतःकरण ।व्यवहार करीत असावा जतन । व्यवहारांतील मानअपमान ।हे टाकावे गिळून ॥ अखंड राखावें रामाचें अनुसंधान ।जेणें सदाचरणाकडे लागेल वळण ॥

माझें नातेंगोतें राम ।हा भाव ठेवून जावें रामास शरण ॥ हें ऐका माझें वचन ।मनानें व्हावें रामार्पण ॥ अनन्य व्हावें भगवंतीं ।जो कृपेची साक्षात् मूर्ती ॥ आपले कर्तेपण टाकावें ।म्हणजे शरण जातां येतें ॥ ज्यानें धरले भगवंताचे पाय ।तोच त्याला झाला उपाय ॥ मी आतां झालों रामाचा ।त्याला अर्पावी सर्व चिंता ॥ मी ज्याचा झालों त्याला माझी काळजी ।हा ठेवावा भाव चित्तीं ॥ माझें हित तो जाणे ।हें जाणून स्वस्थचि राहणें ॥ विषयवासना सुटण्यास उपाय जाण ।आपण जावें रामास शरण ।जें जें करणें आपले हातीं ।तें करून न झाली शांती ।आतां शरण जावें रघुपति ॥ जावें रघुनाथास शरण ।तोच दुःख करील निवारण ॥ एक राम माझा धनी ।त्याहून दुजें आपले न आणी मनीं ॥ अभिमानरहित जावें रामाला शरण ।त्यानेंच राम होईल आपला जाण ॥ आतां जगांत माझें नाहीं कोणी ।एका प्रभु रामावांचुनी ।निर्धार ठेवा मनीं ।शरण जावें राघवचरणीं ।जें जें केलें आजवर आपण ।तें तें रामास करावें अर्पण ॥ जें जें होतें तें राम करी ।तें स्वभावें होय हितकारी ।म्हणून जी स्थिति रामानें दिली ।ती मानावी आपण भली ॥ गंगेच्या प्रवाहांत पडलें ।गंगा नेईल तिकडे गेलें ॥ गंगा जाते योग्य ठिकाणीं ।याचें जाणें सहजासहजीं ॥ तैसें असावें भगवंताचे स्मरणात ।राम ठेवील त्यांत मानावें हित ॥ सर्व जगत् ज्यानें जाणलें मिथ्या ।हें जाणून शरण जावें रघुनाथा ॥ कारण परमात्म्याला जाणें शरण ।याहून दुजा मार्ग न उरला जाण ॥ धन्य तो व्यावहारिक जाण ।जेणें केलें रामास स्वतःला अर्पण ॥

**३३५. रामापरतें सत्य नाही ।श्रुतिस्मृति सांगतात हेंच पाही ॥रामसत्तेविण न हाले पान ।हें सर्व जाणती थोर लहान ॥**

## शुन्यत्वनिरसन

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

मित्रांनो आपण आत्ता पर्यंतच्या अभ्यासले की शून्य हे परमात्म्याच्या अलिकडे पण आहे आणि पलीकडे पण आहे. तुम्ही म्हणाल की ते कसे? तर पहा मित्रांनो आपण जन्माला आलो आईच्या कुशीत होतो तेव्हा आपल्याला शून्य ज्ञान होते. आपली वाढ आईच्या दुधावर व तिने केलेल्या निस्सिम प्रेमाने झाली. म्हणजे आपण आधी शून्यचं नव्हतो का? आता बाल्यावस्था, कुमारवस्था तारूण्यावस्था,प्रौढावस्था, वृद्धावस्था या सर्व अवस्थेतील संक्रमण करत करत शेवटी वानप्रस्थाश्रमात जातो. पण तेव्हा शरीर साथ देत नाही. खंबीर मनाची माणसं नेटानं स्वस्वरूपाशी एकरूप होतात पण मनानं कमकुवत असलेली व्याकुळ माणसं शून्यत्व जीवन जगतात. त्यांना जगण्यासाठी आवश्यक तो संघर्ष नको वाटतो सगळं जग शून्यत्व वाटते. कशात राम वाटत नाही.

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, २४ नोव्हेंबर २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari



राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक

राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188 | कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176,
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९



चंदुलाल बियाणी
संस्थापक अध्यक्ष

Rajasthani Multistate MINI BANKING
www.rajasthanimultistate.in
Powered by Tatkal Banking
आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे...
राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा
तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल
४९८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...

कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य



तात्काळ बँकिंग सुविधा

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा
* नियम व अटी लागू

कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा


# सांडव्याचे पिचिंग काम निकृष्ट दर्जाचे

## ठेकेदार लावत आहे चुना : लघु पाटबंधारे विभागाचा कानाडोळा

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे हाकेच्या अंतरावर असलेल्या साठवण तलावांच्या सांडल्याचे दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे चालू आहे. सदर साठवण तलावाच्या बाजूच्या सांडव्याचे पिचिंग काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत ग्रामस्थांनी तक्रारी केल्या आहेत. साठवण तलावाच्या सांडव्याचे पिचिंगचे काम व्यवस्थित करण्यात आले नाही. तसेच भरावावरील झाडे काढण्यात आली नाहीत. काम उरकून घेऊन बिल काढण्याचा प्रयत्न ठेकेदार व संबंधित अधिकारी करताना दिसून येत आहे सांडव्याचे काम देखील व्यवस्थितरित्या करण्यात येत नाही. संबंधित कामात संपूर्णतः मनमानी सुरू असल्याचे दिसून येते. परंतु सदर काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याने सरकारचा पैसा वाया जाणार आहे. त्यामुळे सदर कामाची सखोल चौकशी करून संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार संघर्ष समितीचे मराठवाडा विभागीय सरचिटनीस गोकुळसिंग राजपूत यांनी केली आहे.सांडव्याच्या ठिकाणी हे काम किती लाखाचे आहे, किती कोटीचे आहे. असे कोणतेही प्रकारचे जागेवर अंदाजपत्रक नाही याविषयी अखिल भारतीय भ्रष्टाचार संघर्ष समितीचे मराठवाडा विभागीय सरचिटनीस गोकुळसिंग राजपूत तथा जेष्ठ पत्रकार यांनी ठेकेदार यांना फोन लावून इस्टमेंट मागितले असता ते आमच्याकडे राहत नाही ते आफिस मधे असते तुम्ही ऑफिसकडून घ्यावे, असे उडवाउडवीची उत्तरे ठेकेदाराने गोकुळसिंग राजपूत यांना दिले आहे. सांडव्याच्या ठिकाणी कच्चा खडीचे डबर वापरून काही मुरुम वापरून पिंचिग काम केले जात आहे. मोठ मोठे तिन ते चार चार क्विंटल डबर वापरून पिचिंग काम करत आहे. यामुळे सांडव्याच्या निकृष्ट दर्जाचे असल्याने आजूबाजूच्या शेतकऱ्यांना खूप मोठा धोका निर्माण होऊ शकतो पिंचिग कोणत्याही प्रकारची लेवर काढून करण्यात आले नाही. कामावरती जाऊन बघितले असता ठेकेदार, इंजिनिअर कोणीही एक दिवस शुद्धा उपस्थित नसून साधे इकडे फिरकून शुद्धा पाहिले नाही. ठेकेदार मात्र उंटावरून शेळ्या हाकण्याचे काम करत आहे पिंचिग कामामधे लाखो रुपयांचा शासनाला चुना लावत आहे. लघु पाटबंधारे विभागाने चालू असल्याल्या सांडव्याच्या पिचिंग कामाची तातडीने पाहणी करून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार संघर्ष समितीचे मराठवाडा विभागीय सरचिटनीस गोकुळसिंग राजपूत यांनी केली आहे. नाही केल्यास अमर उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे.





# सुषमा अंधारेंनी जरांगे पाटलांना खडसावले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून मंत्री छगन भुजबळ आणि मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. यावरून शिवसेना (ठाकरे गट) उपनेत्या, सुषमा अंधारे यांनी जरांगे-पाटलांना खडसावलं आहे. जरांगे-पाटलांची भूमिका पाहून त्यांचे आरक्षणावरील लक्ष्य विचलित होत असल्याचे दिसत आहे. व्यक्तिगत टीका-टिप्पणी करणे त्यांना शोभत नाही, अशा शब्दांत सुषमा अंधारेंनी जरांगे-पाटलांना सुनावले आहे. सुषमा अंधारे म्हणाल्या, जरांगे-पाटील हे सुरूवातीला आरक्षणासाठी लढत असल्याचं निश्चित वाटत होते. पण, अलीकडे त्यांची भूमिका पाहून आरक्षणावरील लक्ष्य विचलित झाल्याचे वाटत आहे. त्यांनी व्यक्तिगत टीका-टिप्पणी करणे शोभत नाही. एकीकडे मागास सांगायचं आणि जरांगे आडनावाबरोबर पाटील लावायचं. आर्थिक मागास असल्याचं बोलायचं आणि दुसरीकडे १०० जेसीबीने फुलांची उधळण करायची. आमच्याकडे काहीच नाही बोलायचं आणि सभेसाठी १५० एकर मोसंबीची बाग तोडायची, असे म्हणत सुषमा अंधारेंनी टीका केली आहे. ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण मिळालं पाहिजे. विधिमंडळाने एक ठराव पास करून केंद्र सरकारकडे पाठवावा. केंद्र सरकारने विशेष अधिवेशन बोलवून मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी अंधारेंनी केली आहे.

# बेलदार समाजाचे उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर:** एकल बेलदार समाजाकडून सातत्याने माजी मुख्यमंत्री दादासाहेब कन्नमवार यांची जयंती व पुण्यतिथी शासकीय स्तरावर साजरी करा, अशी मागणी केली जात आहे. न्याय मिळत नसल्याने समाज बांधवांकडून २४ ते २६ दरम्यान संविधान चौकात उपोषणाची घोषणा करण्यात आली आहे. कन्नमवार यांच्या २४ नोव्हेंबर २०२३ रोजी ६० व्या पुण्यस्मरण दिवशी हे आंदोलन केले जाणार आहे.

# समाजात तेढ निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करणार : पो. नि. खेडकर

आधुनिक केसरी न्यूज



**परतूर :** मंठा पोलीस ठाणेतर्फे हद्दीतील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते सध्याच्या राज्यातील मराठा आरक्षण, धनगर आरक्षण, ओबीसी आरक्षण इत्यादी आरक्षणाच्या मुद्यावरुन वेगवेगळ्या प्रकारची आंदोलने सुरु असुन त्याबाबत वेगवेगळ्या राजकिय नेत्यांकडून वेगवेगळ्या भूमिका मांडण्यात येत आहेत, या अनुषंगाणे समाजातील काही समाज विघातक प्रवृत्तीचे नागरीकांकडुन सोशल मिडीयाचे माध्यमातुन ईतर समाजाविषयी अथवा नेत्यांविषयी अक्षेपार्ह मजकुराचे अथवा चित्र असलेले मेसेज फोटो, व्हिडिओ इत्यादी पाठविण्यात येत असल्याने दोन समाजात तेढ निर्माण होऊन काही ठिकाणी वादाच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे मंठा तालुक्यातील सर्व समाजातील नागरीकांनी आपल्या तालुक्यातील सामाजीक सलोखा व शांतता टिकुन ठेवण्यासाठी नागरिकांनी सोशल मीडियाचे माध्यमातून इतर समाजाविषयी अथवा नेत्यांविषयी अक्षेपार्ह मजकुराचे अथवा चित्र असलेले मेसेज फोटो, व्हिडिओ इत्यादी प्रसारित करु नयेत, अक्षेपार्ह मजकुर फोटो, व्हिडिओ प्रसारित केल्याची माहिती मिळाल्यास संबंधिता विरुद्ध प्रचलीत कायद्यान्वये गुन्हे नोंद करुन कार्यवाही करण्यात येईल, सर्व नागरिकांनी शांतता व सुव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी सहकार्य करावे, असे आव्हान पोलीस निरीक्षक मारुती खेडकर यांनी केले आहे.

# सप्तरंगी ढंगात जयअनंत महोत्सवाचे थाटात उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** भारतीय संस्कृतीतील विविध लोककला, पाककला तसेच शिवकालीन ऐतिहासिक देखावे अशा भरगच्च कार्यक्रमांची मेजवानी असलेल्या जयअनंत महोत्सवाचे उद्घाटन काल माजीमंत्री तथा माजी खासदार अनंतराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली चिखली मतदार संघाच्या आमदार सौ. श्वेताताई महाले पाटील यांच्या हस्ते थाटात पार पडले. सदर कार्यक्रमास रिसोड मालेगाव विधानसभा मतदार संघाचे प्रचार प्रमुख ॲड. नकुल देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. जय अनंत महोत्सव २०२३ वर्ष तिसरे, उत्सव महाराष्ट्रीयन संस्कृतीचा चे उद्घाटन माजी मंत्री माजी खासदार अनंतरावजी देशमुख यांच्या अध्यक्षतेत, चिखलीच्या आमदार सौ श्वेता महाले पाटील यांच्या हस्ते व भाजपा रिसोड मालेगाव विधानसभा निवडणूक प्रमुख ॲड नकुलदादा देशमुख यांच्या विशेष उपस्थितीत संपन्न झाला. ॲड. नकुल दादा देशमुख यांच्या संकल्पनेतून साकार झालेला. विभागात लोकप्रिय असलेला जय अनंत महोत्सव 2023 चा शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. 102 स्थानिक महिला बचत गट, स्थानिक समूह, व्यावसायिक यांची विविध वस्तू विक्री व खाद्यपदार्थांच्या स्टॉल सहित, शिवकालीन शस्त्रगार, विविध नृत्यकला, किर्तन प्रवचन, दिंडी, विविध संत परंपरा, भातुकलीचा खेळ, अंगावरती शहारे आणणारे शिवकालीन प्रसंगाचे सादरीकरण, जादूचे खेळ सहित अनेक मनोरंजनाच्या प्रसंगासह यावर्षी या रंगारंग कार्यक्रमाची शुभारंभ झाला. यावेळी उद्घाटनानंतर माजी मंत्री अनंतरावजी देशमुख, आमदार श्वेता महाले, भाजप नेते नकुल देशमुख, जयश्रीताई देशमुख,चैतन्य देशमुख, सौ.अमृताताई,विभागीय कृषी संचालक किसनराव



मुळे, जिल्हा कृषी अधीक्षक हरिफजी शहा रिसोडच्या तहसीलदार सौ. प्रतिक्षा तेजनकर, रिसोडच्या नगराध्यक्ष सौ.विजयमालाताई कृष्णाजी आसनकर, रिसोड पोलीस स्टेशन ठाणेदार देवेंद्रजी ठाकूर, रिसोडनगर परिषद मुख्यधिकारी सतिशजी शेवदा सहित मान्यवर मंडळी यांनी जयंत महोत्सवाच्या सर्व स्टॉलची पाहणी केली सोबतच सादर कर होत असलेल्या सर्व कला सादरीकरण याची पाहणी केली. सर्व मान्यवरांनी विविध खाद्यपदार्थ कला सादरीकरण व गुणवत्तात्मक दर्जाच्या वस्तू विक्रीची कौतुक करून आढावा घेतला. महोत्सवात सादर होणाऱ्या प्रत्येक मनोरंजनात्मक व अंगावर शहारे आणणाऱ्या व इतर सर्व कला नाटिका सादरीकरणाचे महोत्सवात प्रचंड संख्येने येणाऱ्या परिवारांनी भरभरून कौतुक केले. तसेच शिस्तबद्ध नियोजन करण्यात आलेली काटेकोर व्यवस्था याचेही कौतुक केले. अशाप्रकारे जयंत महोत्सव 2024 वर्ष तिसरीचे उद्घाटन संपन्न झाले व मोठ्या प्रमाणात विभागातील जिल्ह्यातील व तालुक्यातील परिवारांनी आपल्या सदस्यासहित भेट देत आनंदी क्षणाचा अनुभव घेतला.

## पलटवार

आधुनिक केसरी

राजस्थानमधील प्रचाराची रणधुमाळी शांत झाली. दिवाळीपेक्षा ही या प्रचारात आरोप-प्रत्यारोपाचे बॉम्ब फुटले. आरोपांची राळ उडाली. शाब्दिक चकमकी उडाल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे एक वक्तव्य चांगलेच गाजले. त्यांनी राजेश पायलट यांचा दाखला देत कॉंग्रेस पक्षावर जोरदार हल्ला चढवला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे राजस्थानमधील भीलवाडा येथील प्रचार सभेत बोलत होते. त्यांनी कॉंग्रेसवर जोरदार शाब्दिक प्रहार केला होता. त्यावर राजेश पायलट यांचा मुलगा सचिन पायलट यांनी आता प्रतिवार केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निवडणूक प्रचार सभेत कॉंग्रेसवर शाब्दिक बाण सोडले. 'एक वेळा राजेश पायलट यांनी कॉंग्रेसच्या फायद्यासाठी, तिला आव्हान दिले होते. पण हा बदल कॉंग्रेसला रुचला नाही. त्याचीच शिक्षा आज ते पायलट यांच्या मुलाला देत असल्याचा आरोप त्यांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या वक्तव्याचा सचिन पायलट यांनी खरपूस समाचार घेतला आहे. पंतप्रधानांच्या वक्तव्यात सत्यता नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. दिवगंत राजेश पायलट हे इंदिरा गांधी यांच्यापासून प्रेरीत होऊन लोक सेवा करण्यासाठी कॉंग्रेसमध्ये दाखल झाले होते. त्यांनी दीर्घकाळपर्यंत जनतेची सेवा केली. ते आयुष्यभर जातीयवादी शक्तींविरुद्ध लढले. पंतप्रधानांनी भिलवाडा येथील सभेत जी आठवण सांगितली. ती 1997 मधील एका घटनेच्या आधारे सांगितली आहे. त्यावेळी कॉंग्रेसने अध्यक्ष पदाची निवडणूक घेतली होती. तेव्हा पक्षात सीताराम केसरी यांच्या शब्दाला मान होता. पण राजेश पायलट यांनी सीतामराम केसरी यांना या निवडणुकीत आव्हान दिले होते. पायलट यांना आपण निवडून येणार नाही, याचा अंदाज आला होता. पण त्यांनी निवडणूक लढवली. पण पुढे झाले ते सर्वांना माहिती आहे. यावरच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निशाणा साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या हल्ल्यानंतर त्याला सचिन पायलट यांनी उत्तर दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना माझ्या वर्तमान आणि भविष्याची चिंता करण्याची गरज नसल्याचा पलटवार त्यांनी केला. त्याची चिंता जनता आणि माझा पक्ष करेल, असे ते म्हणाले. राजस्थानमध्ये 25 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. पाच राज्यांची मतमोजणी 3 डिसेंबर रोजी होईल.

# खा.संजय राऊत खरंच पिसाळले?



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**वाचा नसणारे प्राणी जेव्हा चवताळुन वेड्या पिशासारखं वागतात त्यांना पिसाळलं असं ग्रामीण भागात म्हटल्या जाते. मग तो कुत्रा असेल किंवा जनावर, लांडगा देखील पिसाळु शकतो. कुत्रा जर पिसाळला तर सर्रास हमरस्त्यावर चावा घेत फिरतो. त्यात त्याच्या दृष्टीला दुसरं काही दिसत नाही. राजकिय क्षेत्रात तसे काही नेते पिसाळल्यासारखेच वागतात. ज्यांच्या दृष्टीला संविधान पदावर बसलेला व्यक्तीचं महत्व कळत नाही. विरोधकांवर काय बोलावं?कुठं बोलावं? हे सुचत नाही.**

केवळ बदनामी करायची म्हणून अगदी चावा घेतल्याप्रमाणे नको त्या गोष्टी पुढे आणायच्या. पण एक लक्षात घेतलं पाहिजे की पिसाळलेल्या प्राण्यावर कुणाचा विश्वास बसत नाही. तसंच काही फालतु बडबड करणाऱ्यांवर सामान्य जनतेचा विश्वास बसत नाही. काल माध्यमांसमोर बोलताना राऊतांनी चक्क हातात ग्लास घेवुन तोंडात घोट टाकल्याची ऍक्शन्‌ केली अन्‌ थेट पंतप्रधानाचा ब्रॅंड काढला. बरं झालं आदित्य ठाकरे दारू पितो हे मान्य त्यांनी केले. पण कुठलंही भान नाही. जाईल तसा तोल जावु देणं आणि बोलणं हे खऱ्या अर्थाने राजकिय संस्कृतीला शोभुन दिसत नाही. बिथरलेल्या मानसिकतेत राजकारण करताना काल त्यांनी भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कौटुंबिक सहलीचा फोटो ट्विट करत राळ उठवुन दिली. त्यावरूनच खऱ्या अर्थाने राऊतांची वैद्यकिय चाचणी उद्धवजींनी करून घेणे भाग वाटते. विश्व चषक सामन्यात अहमदाबादेत ऑस्ट्रेलियाविरूद्ध भारताची लढत झाली त्यात आपला पराभव झाला. खेळ हा शेवटी खेळच असतो. कुणीतरी हारणार? तर कुणीतरी विजयी होणार? मात्र ज्या भारतीय खेळाडूंनी सक्षम कर्णधार रोहित शर्मा यांच्या नेतृत्वाखाली विश्वचषकात सलग दहा सामने जिंकले ही कामगिरी अंतिम सामना जिंकण्यापलीकडची म्हणावी लागेल. खरं तर खेळात राजकारण घुसवायला नाही पाहिजे. मात्र या महाशयांनी अहमदाबादला शेवटचा सामना झाला. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सामना पाहण्यासाठी आले. त्याला चार दिवसापासुन राजकिय रंग दिला. खरं पाहिलं तर राऊतांच्या बडबडीमुळे भारतीय खेळाडूंचे मनोधैर्य खचले असं म्हटलं तर आश्चर्य वाटण्याचं कारण नाही. कारण मैदानात खेळाडूंनी पाय ठेवण्या अगोदरच या माणसाने राजकिय रंग लावला. दुसरी गोष्ट म्हणजे मोदीजींनी मागच्या आठ-नऊ वर्षाात देशाच्या क्रीडा क्षेत्रात कमालीचे बदल केले. नवनविन खेळाडूंना प्रोत्साहित करताना प्रसंगी जातीने उपस्थित राहुन कौतुकही केले. त्याचाच भाग म्हणून जगाच्या पाठीवर भारतातल्या विविध क्षेत्रात खेळाडूंची कामगिरी उल्लेखनीय घडताना दिसते. पण ज्यांना केवळ राजकारण करायचं अशा लोकांना चांगलं दृष्टीत पडेल तरी कसं? अगोदर उल्लेख केल्याप्रमाणे कशातही राजकारण करू पाहणारे संजय राऊत यांची मानसिकता अलीकडे पाण्याबाहेर पडलेल्या माशासारखीच झाली की काय? असे लक्षात येते आणि ते साहजिकच आहे. कारण केंद्रात सत्ता नाही. राज्यात सत्ता नाही. भाजपाला धोका देवुन मुख्यमंत्री पदासाठी महाविकास आघाडी तयार करून केलेला खटाटोप पाण्यात गेला. कारण ओरिजनल शिवसेना एकनाथ शिंदेंच्या माध्यमातून बाहेर पडली. दुसरं असं की, महाविकास आघाडीमध्ये एकमत राहिलं नाही. खा.संजय राऊत यांना उद्धवजीनं सामनामध्ये संपादक पदावरही ठेवलं नाही. मग अशा वेळी खरंच मानसिकता पिसाळलेल्या प्राण्यासारखी होवु शकते. ज्यांना जळीस्थळी केवळ विरोधक दिसतात. मग त्यांच्या नावाने शिमगा करीत बसल्याशिवाय दुसरं कामच नाही. राऊत एका पत्रकाराने राऊतांना विचारले त्यावर या माणसाने दिलेले उत्तर अगदी झिंगाट नशेत तरलेल्या नव्हे तर गांजा मारलेल्या व्यक्तीने बोलावं तसंच होतं. उजवा हात तोंडापाशी घेवुन ऍक्शन करताना थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी जो ब्रॅंड पितात तोच आदित्य ठाकरे पितात असं म्हणत त्यांनी आदित्य ठाकरे दारूडे असल्याचं कबुल केलं. खरं तर अशा राजकिय नेत्याची किव येते की ज्यांना पत्रकारांच्या समोर काय आणि कसं बोलावं? याचं भान रहात नाही. संविधानाच्या आधारे सर्वोच्च पदावर बसणारा व्यक्ती आणि त्याच्यावर आरोप करताना किमान आपली लायकी आणि पात्रता ओळखायलाच हवी. राऊत स्वतःचं आत्मपरिक्षण करतच नाहीत त्याची सत्यता जनतेला पटली तरच त्या आरोपात तथ्य असु शकतं. अन्यथा असे शंभर आरोप फुसक्या बॉंबसारखे निघतात. एका मोठ्या सत्ताधारी पक्षाच्या अध्यक्ष पदावर बसलेल्या व्यक्तीची बदनामी आपण कशी करू शकतो? एवढाच अहंम भाव मनात ठेवुन या माणसाने केलेली कृती विकृत स्वरूपाची म्हणावी लागेल. खरं तर अशा माणसाकडून राज्यात व्यक्तीगत चारित्र्यहनन करण्याची मोहिम जेव्हा समोर येते तेव्हा खरंच राजकारण कुठे नेवुन ठेवणार? असा प्रश्न पडतो. या निमित्ताने ठाकरे शिवसेनेचे प्रमुख उद्धवजींना एक सांगणे आहे की त्यांनी संजय राऊतांना काही दिवस मानसोपचार तज्ञाकडे घेवुन जाण्याची गरज वाटते. हे जरं



म्हणजे रोज सकाळी नऊ वाजता घराघरात वाजणारा भोंगा. सुरूवातीला जनतेला बरं वाटलं. पण रोजची किटकिट पाहिल्यानंतर टिव्हीवर त्यांचा चेहरा दिसला की लोक आता टिव्ही बंद करू लागले हे तितकंच खरं. अगोदर म्हटल्याप्रमाणे पिसाळलेल्या प्राण्यासारखं त्यांचं राजकिय वर्तन सद्या अशोभनीय वाटतं. पत्रकार परिषदेत कुठल्या भाषेत काय बोलतील? ज्यांना सामाजिक संस्कृतीचं भान रहातच नाही. मध्यंतरी किरीट सोमय्याच्या विरोधात अश्लिल भाषा पत्रकार परिषदेतच तोंडुन बाहेर पडली होती. काल तर या माणसाने कहरच केला. उद्धवजीचे सुपुत्र आदित्य ठाकरे यांचा नशा करतानाचा एक फोटो ट्विट झाला होता. तो धागा पकडून आणि केलं तर आपली लायकी त्यांना कळुन चुकेल. पण ज्यांचं भान जागेवर नसतं,मानसिकता बिथरलेली असते नव्हे तर पिसाळलेल्या प्राण्यासारखी असेल तर मग जनतासुद्धा त्यांच्याकडून चांगलं वर्तन अपेक्षित करणं शक्य नाही. भाजपाचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे कौटुंबिक सहलीसाठी मकाऊ येथे गेले. आपल्या लेकराबाळासह एका हॉटेलमध्ये थांबले असताना कशिनो रेस्टॉरंट जिथे एकत्रित होतं. तिथला एक फोटो या माणसाने ट्विट केला. आपण जणुकाही वेगळा इतिहास घडवणार भीमदेवी थाटात त्यांनी पत्रकार परिषद घेवुन आरोप केला. पण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की विरोधकांवर आरोप करताना केलं नाही तर शिल्लक राहिलेल्या पक्षाची अवस्था यापेक्षाही पनौतीकडे गेल्याशिवाय रहाणार नाही. भारत-ऑस्ट्रेलिया लढतीत आपला पराभव होण्यामागचं खरं कारण अशी माणसच ज्याला कारणीभुत असं म्हटलं तर वावगं नाही. त्यांची जीभ काळी असावी. कारण दोन दिवस अगोदर राऊतांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी मॅच पहायला येणार म्हणत नकाराची घंटा वाजवली होती. कदाचित तो शाप भारतीय खेळाडूला लागला असावा. ज्यामुळे ऑस्ट्रेलियाचा विजय झाला. विजयाने उन्मत्त झालेल्या ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी जेव्हा विश्वचषक कप पायदळी तुडवला यावर हा माणुस एक शब्द बोलला नाही हे विशेष.

# सिंगल युज प्लास्टिकचा मोठा धोका



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**एकदा वापरून फेकून देण्याजोग्या ( सिंगल युज ) प्लास्टिकचा वापर सर्रास होताना दिसत आहे. सिंगल युज प्लास्टिक मध्ये प्लास्टिकचे कप, पिशव्या, पॉलिथिन, स्ट्रॉ, पाण्याची बाटली, प्लेट, अन्न पदार्थ ठेवण्यासाठी झाकण्यासाठी वापरण्यात येणारे पॅकिंग कागद, प्लास्टिकचे ग्लास, पत्रावळ्या यांचा समावेश होतो. सहज उपलब्ध होत असल्याने जो तो सिंगल युज प्लास्टिकचा वापर करतो. सहज आणि कमी पैशात उपलब्ध होत असल्याने सिंगल युज प्लास्टिकचा वापर वाढला आहे. आपल्या देशात दरवर्षी लाखो टन सिंगल युज प्लास्टिकचा वापर केला जातो. भविष्यात हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.**

सिंगल युज प्लास्टिकचा कचरा बायोडीग्रेडिबल म्हणजे कंपोस्ट होऊ शकत नाही. सिंगल युज प्लास्टिक जाळूनही नष्ट होत नाही. तो मायक्रो कणांच्या माध्यमातून आस्तित्वात राहतो. सिंगल युज प्लास्टिक जाळण्याचा प्रयत्न केला तर वायू प्रदूषण होते. हा कचरा जमिनीखाली दबला तर पाण्याच्या स्त्रोतांना अडथळा निर्माण करतो. हे सिंगल युज पलिस्टक नदी, विहीर, तलावात टाकले तर जलस्त्रोत खराब होतात. नदीतून वाहून सिंगल युज प्लास्टिक समुद्रात जाऊन साठते. सिंगल युज प्लास्टिकमुळे जलचारांना मोठा धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिकचे कण जलचरांच्या पोटात जात असल्याने त्यांचे आस्तीत्वाच धोक्यात आले आहे. सिंगल युज प्लास्टिक नष्ट होत नाही. पाण्यात, जमिनीत मायक्रो कण वर्षानुवर्ष राहतात. सिंगल युज प्लास्टिकमुळे जलप्रदूषणही होते. सिंगल युज प्लास्टिक कचरा कुंडीत टाकला जातो. हा कचरा गुरांकडून खाल्ला जातो. त्यामुळे गुरांना आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होतात. एकूणच सिंगल युज प्लास्टिक मुळे जल, वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

मनुष्यप्राण्यांसह इतर जैवविविधतेला सिंगल युज प्लास्टिकमुळे मोठा धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिकमुळे पर्यावरणालाही धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिक मानवी आरोग्यासाठी तसेच जैवविविधतेसाठी हानिकारक असल्याने त्याचा वापरावर सरकारकडून टप्पा टप्प्याने निर्बंध लादले जात आहेत. निर्बंधासोबतच सिंगल युज प्लास्टिकचे दुष्परिणाम नागरिकांपर्यंत पोहचिण्यासाठी सरकारने जनजागृती करायला हवी. सरकारने सिंगल युज प्लास्टिकचे दुष्परिणाम लोकांना समजावून सांगायला हवेत. शाळा कॉलेजमधून देखील याबाबत प्रबोधन करायला हवे. प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन कारणे आणि सिंगल युज प्लास्टिक वस्तूंचा वापर कमी करणे या दोन्ही विषयी जाणीव जागृती होणे, हे अत्यंत महत्वाचे आहे. सिंगल युज प्लास्टिकमुळे संपूर्ण सजीव सृष्टीलाच धोका निर्माण झाल्याने नागरिकांनीच सिंगल युज प्लास्टिक पासून दूर राहायला हवे. सरकारने सिंगल युज प्लास्टिकवर निर्बंध लादले जात असेल तरी त्याचा वापर कमी होताना दिसत नाही. त्यामुळे या प्लास्टिकचे दुष्परिणाम जाणून घेत नागरिकांनी सिंगल युज प्लास्टिकचा वापर बंद करणे हाच भविष्यात मानवजीवन व जैव विविधता राखण्याचा मार्ग आहे.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# राजकीय अभिलाषेपोटी ओबीसी प्रवर्गातूनच आरक्षणाचा घाट घातला जातोय

आधुनिक केसरी

राज्यामध्ये सध्या आरक्षणावरून जों बहुजन समाजामध्ये जातीय उद्रेक होऊ पाहतोय तों अतिशय चिंताजनक आहे. मुळात मराठा समाजामध्ये अर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या घटकांसाठी जें 10%EWS आरक्षण आहे तें खरंच प्रभावी आहे ज्याचा मराठा समाजातील गरजू मुलांना चांगल्या प्रमाणात फायदा होताना दिसत असताना निव्वळ राजकीय अभिलाषेपोटी जों ओबीसी प्रवर्गातूनचं आरक्षणाचा घाट घातला जातोय तों माझ्यामते चुकीचा आहे. कारण लोकसंख्येच्या दृष्टीने प्रचंड मोठा असणारा समुदाय सरसकट ओबीसी प्रवर्गात येण्याची मागणी करत असल्यामुळे ओबीसी समाजाच्या लोकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होणं स्वाभाविक आहे हें सरकारला समजायला हवं. जगाला हेवा वाटावा असे मराठा समाजाचे जें मूकमोर्चे झालेत तें खरंच क्रांतिकारी होते विशेष म्हणजे या मुकमोर्चात मराठाइतर जातींच्या लोकांचा हीं उत्स्फूर्त सहभाग होता परंतु सद्य



गिरीश सुदाम बनकर
सामाजिक कार्यकर्ता

स्थितीला काही समाज कंटकांकडून जाळपोळ व धमकी सत्र जें चालू आहे तें मराठा समाजाच्या आरक्षण विषयक मागणीला पोषक पूरक नसणारं आहे हें प्रथमतः लक्षात घेतलं पाहिजे. मुळात आजपर्यंत या राज्याचे धोरणकर्ते कोण?असा जर प्रश्न विचारला तर तुम्हांला आपसूकच उत्तर मिळेल कीं प्रस्थापित मराठा लोकप्रतिनिधी मग जर आत्तापर्यंत या राज्यावर व संसदेत महाराष्ट्रातून बहुसंख्येने मराठा समाजाच्या लोकप्रतिनिधीना विपुलतेने संधी दिली असेल तर या लोकप्रतिनिधींनी आत्ता राज्यात जें आरक्षण विषयक समाजा-समाजात तेढ उत्पन्न करणारे प्रश्न उत्पन्न झालेत तें होऊच द्यायला नव्हते पाहिजे हें जळजळीत सत्य आहे जें काही लोकं स्वीकारताना दिसत नाही. मुळात हा वाद जों आहे तों प्रस्थापित सरंजामी मराठा विरुद्ध अर्थिक दुर्बल किंवा सर्वसामान्य मराठा असा आहे. मुळात एकाला आरक्षणाच्या चौकटीत यायचचं नाही तर दुसऱ्याला अर्थिक दुर्बलतेच्या परिस्थितीमुळे आल्याशिवाय दुसरा पर्याय दिसत नाही आणि नेमकी मूळ मेख हीं इथंच आहे. एकीकडे EWS आरक्षण हें त्यां अर्थिक दुर्बल घटकांसाठी वरदायीनीचं काम करत असूनही काही मराठा आरक्षण आंदोलन कर्त्यांच्या ओबीसी प्रवर्गातूनच आरक्षण मिळण्यासाठीच्या आग्रही मागणीमुळे आता ओबीसी प्रवर्गातील लोकांमध्ये अस्वस्थता वाढत आहे. त्यामुळे राज्यात ज्याप्रमाणे मराठा समाज आरक्षनाच्या मागणी साठी जसा पुढं आलाय तसा ओबीसी समाजहीं त्यांना मिळालेल्या आरक्षणाच्या संरक्षणासाठी पुढं आला म्हणजे तों मराठा द्वेषी ठरविन्याचा जों केविलवाणा प्रकार चालू आहे तों अतिशय निंदनीय तर आहेच परंतु बहुजन म्हणून सर्वच बहुजन समाजाला मागे नेणारा आहे.अर्थात त्यात मराठा समाज हीं प्रामुख्याने येतो हें वेगळं सांगायला नको.सर्वांत महत्वाची अजून एक गोष्ट मला अधोरेखित करावीशी वाटते ती म्हणजे महापुरुषांना जातीय चौकटीत बघणं हें महाराष्ट्राच्या पुरोगामी विचारांना काळिमा फासणारं आहे. कारण महापुरुशांची सामाजिक क्रांतिकारी कार्य हीं कोना एका जातीसाठी नव्हती तर ती मुख्य प्रवाहापासून दूर असणाऱ्या गोर गरीब शोषित, वंचित, उपेक्षित आणि दलित समाजाला त्यांच्या न्याय हक्कासाठी दिलेला अतीव संघर्षाचा लढा होता हें आजच्या पिढीला बहुदा कळत नाही. ज्यावर मोठ्या प्रमाणावर प्रबोधन होणं गरजेचं वाटतं नाहीतर महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय संस्कृतीला हें पुढे जाऊन अशोभनीय राहील ज्यातून या पुरोगामी विचारांच्या महाराष्ट्र राज्याचा सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता दिसून येत आहे. ज्यावर राज्य शासनाने गांभीर्यपूर्वक व चिकित्सक दृष्टिकोनातून पाहणं गरजेचं वाटतं.

# फरांडीच्या साह्याने गोदावरी पात्रातून अवैध वाळू उपसा जोरात सुरू

## तहसील कार्यालयाचे वाळू तस्करांना अभय!

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** गोदावरी पात्रातून फंराडीच्या साह्याने दिवस रात्र अवैध वाळू उपसा कोपरगाव तहसील कार्यालयाच्या अभया मुळे जोरात होत असतांना कारवाई करणार कोण असा प्रश्न निर्माण झाला आहे. अवैध वाळू तस्करांना कोपरगाव तहसील कार्यालयाच्या मिळणाऱ्या अभयामुळे माहेगाव कुंभारी धारणगाव गोदावरी नदी पात्रातून फंराडीच्या साह्याने दिवस रात्र वाळ काढुन ती राजरोसपणे ट्रँक्टर हायड्रोलीक ट्राँली पाच हजार रुपयांना विक्री होत असल्याने वाळूस सोन्याचे मोल आल्याने तस्करी राजरोसपणे चालू असुन देखील कारवाई करणार कोण असा प्रश्न निर्माण झाला आहे. धारणगाव वनविभागाच्या हद्दीत फंराडीच्या साह्याने होणारा वाळु उपसा हा सर्व सामान्य जनतेच्या नजरेला पडत असतांना महसूल विभागाच्या कारवाई मध्ये ना फरांडी सापडते ना ट्रक्टर ? धारणगाव तलाठी कार्यालयात तलाठी हजर असतांना दिवसा वाळु तस्कर वाळुने भरलेले ट्रँक्टर कार्यालया समोरुन घेवुन जातात त्यांना कारवाई करण्याचे अधिकार नाही का? असा प्रश्न तालुक्यातील जनतेला पडला आहे माहेगाव- कुभांरी शिव रस्त्याने वन विभागाच्या हद्दीतून होणारा वाळु उपसा बंद होण्यासाठी अनेक सामाजिक संघटनांनी आंदोलन केले तरी देखील अवैध वाळु उपसा थांबला नाही हे विशेष ! स्वर्गीय माजी खासदार शंकरराव काळे यांनी गोदावरी वसुंधरा वाचवण्यासाठी न्यायालयात दाद मागितली होती त्या गोष्टी चा तालुक्यातील धुरीनांना विसर पडल्याने पाणी बेसुमार वाळु उपशामुळे कडवट बनुन शेतीचे अर्थ कारण धोक्यात येवून रासायनिक खतावरील अधिभारामुळे प्रदूषणात भर पडत आहे. तहसीलचे अवैध वाळू उपसा प्रतिबंधक नियुक्त पथक हा केवळ सरकारी फार्स असुन जनतेला खुळ्यात काढण्याचा प्रकार आहे. आज पर्यंत तहसीलदारासह अनेक कर्मचारी वाळु तस्करां कडुन लाच घेतांना चतुर्भुज झाले असल्याचे तालुक्याने उघड्या डोळ्यांने पाहिले आहे. वाळु तस्करीस पोलीस अभय देत असल्याने महसुल विभागाच्या कारवाई स मर्यादा येतात ही बाब नाव न सांगण्याच्या अटिवर महसुल कर्मचाऱ्यांने आमच्या प्रतिनिधीस दिली. वन विभागाच्या राखिव वना मधुन वाळु तस्करांनी रस्ता करुन वन संपदेला हानी पोहचुन जंगली जनावरांचा अधिवासाला बाधा पोहचत असताना देखील वन विभाग वन कायद्यान्वये वाळु तस्करांवर गुन्हा दाखल का करत नाही असा प्रश्न जनता विचारु लागली आहे. महसूल विभागाची घरपोहच ६०० रुपये ब्रासने शासकीय वाळु हा तालुक्यात लबाडा घरचे आवतन ! जेवल्यानंतर च खरे ते काय ? याची जनता आतुरतेने वाट पहात आहे . महसूल विभाग कोपरगाव पोलीस व वन विभागाचे हात दर महिण्यास ओले होत असल्यामुळे कारवाईची शक्यता नसल्याने प्रांत अधिकारी शिर्डी पोलीस अधीक्षक अहमदनगर यांनी संयुक्त कारवाई केल्यास कोपरगाव तालुक्यातील गोदावरी पात्रातून होणारी अवैध वाळू तस्करीचे समुळ उच्चाटन करणे अवघड कार्य नाही हे तितकेच खरे आहे.





# वडोद बाजार ते भिवसने वस्ती सिमेंट रस्त्याचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** वडोद बाजार ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या भिवसाने वस्ती याठिकाणी असलेल्या रस्त्यासाठी जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाकडून निधी उपलब्ध झाला असून या रस्त्याचे गुरुवारी सकाळी उद्घाटन करण्यात आले. या रस्त्यावर सिमेंट रस्ता होणार असून सरपंच पाकीजा पठाण उपसरपंच गोपाळ वाघ ग्रामपंचायत सदस्य डॉ. सुहास वायकोस, राजीक शेख, बाबुराव मंदाडे, शुभम गंगावणे, काकाजी कोलते, गोविंद पाडेजी, शामराव दुधे, साबेर पठाण, अशोक शिंगारे, रमेश वाघ, रामकिसन वाघ, विलास मस्के, रामा ब्राह्मणे, रामसिंग पांढरे, उदयसिंग केवट, पन्नालाल केवट, दोलत ब्रहामने, रेशमाची मस्के, शैलेश केवट, बळवंत वाघ, दौलत वाघ, रामदास कापसे, सलीम सोदगर, बाबु शेठ, अजिनाथ वाघ, जनार्दन शिनगारे ग्रामपंचायत कर्मचारी यावेळी उपस्थित होते.




महाराष्ट्र Business Katta












# आनंदी जीवनाचा उत्तम मार्ग



माधव अरुणराव डाके
संपर्क क्र. 9730115620

आधुनिक केसरी

**चांगल्या गोष्टींचा छंद,आवड, रुची असणारी व्यक्ती कधीच एकटी नसते. आणि एकटी नसते म्हणून ती उदासीन नसते. तिच्या सोबतीला आनंद जणू सावली सारखा सोबत करत असतो. जीवनात आनंद निर्माण करायचा असेल आणि जीवनातील अनेक वळणावर आलेली विविध दुखं, वेदना, उदासीनता, कंटाळा, आळस दूर करायचा असेल तर... .मनुष्याने स्वतः ला जाणीवपूर्वक काही ना काही छंद लावून घ्यायलाच हवेत. चांगले छंद आपला केवळ वेळच घालवत नाहीत तर आपल्याला नवनिर्मितीसह भरभरून आनंद प्रदान करत असतात.**

प्रत्येक व्यक्तीने कोणता ना कोणता छंद अवश्य लावून घ्यायला हवा. आणि सातत्य ठेऊन जोपासायलाच हवा.

हल्लीची मुले छंदाअभावी मोठ्याच अडचणीत सापडली आहे. सततचे मोबाईल व टीव्ही स्क्रीनिंग मुळे ती डोळे,मान,पाठ,कान या अव्यावांसह मेंदू विकार मानसिक अनारोग्य या विकारांना बळी पडलेले आहेत. मोबाईल फोन, टेलिव्हिजन,संगणकाची स्क्रीन,इंटरनेट हे मानवाचे भविष्यातले सर्वात मोठे शत्रू आहेत असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

मी माझ्या स्वतःच्या मनाची काळजी स्वतःच घेतो. दिवसातला काही वेळ मोबाईल,टीव्हीसाठीही देतो. पण तो किती द्यायचा हे मात्र मी माझ्या मनाशी पक्के ठरवलेले असते. उरलेल्या वेळेत मराठी साहित्य,धार्मिक ग्रंथ, वाचन, चिंतन, नामस्मरण,आवडीचे संगीत ऐकणे, या गोष्टींसाठी आवर्जून वेळ काढतो. आपल्याला चालू घडामोडीचे ज्ञान व्हावे, सोशल मीडियावर अभिव्यक्त होता यावे,करिता दिवसातला काहीसा वेळ देणे अत्यावश्यक आहे.परंतु दिवसभर मोबाईलशी झटत राहणे, हे मात्र मानसिक विकलांगतेचे लक्षण आहे असे वाटते.

दिवस आनंदात,उत्साहात आणि निरोगी घालवण्यासाठी काही वाईट सवयी बंद करून काही हितकारक सवयी लावून घेणे मला इथे महत्वाचे वाटते. उदाहरणार्थ तुमचा दिवस आनंदी,उत्साही व निरोगी जाण्यासाठी भल्या पहाटे उठण्याची सवय लावणे नितांत गरजेचे आहे. उठल्यानंतर जवळपास असणारी मैदाने किंवा पाऊलवाटा,कमी वर्दळ असणारी हम रस्ते,स्वच्छ असलेले शांत वाटणारी रस्ते,झाडाझुडपांनी गजबजलेली हमरस्ते, शक्य असल्यास डोंगर चढाई, जिमनेशियम, प्राणायाम आणि योगासनांचा वर्ग या पैकी काहीतरी जॉईन करणे व त्यात सातत्य ठेवणे नितांत गरजेचे आहे.

दिवसभरातील उदासीनता, कामामुळे आलेला थकवा,आळस, जांभळ्या,कंटाळा घालवण्यासाठी तसेच सर्दी-पडसे ,खोकला, या छोट्या मोठ्या व बीपी-शुगर यासारख्या जीवनशैली बदलल्यामुळे घरोघरी पाहुणे बनुन आलेल्या आजारांना दूर घालवण्यासाठी भल्या पहाटे उठणे व मैदानावर फिरायला जाणे किंवा जिम्नॅशियम योग प्राणायाम वर्ग जॉईन करणे व त्यांचे छंदात रूपांतर करणे आता काळाची गरज बनलेली आहे. सकाळी उठने व वरील पैकी कोणत्याही एका गोष्टींचा जर मनुष्याने छंद लावून घेतला तर तो छंद आमचं मोठंच हित करणारा असेल ही गोष्ट वाचकांनी गांभीर्याने ध्यानात घ्यायला हवी.

लेख वाचताना लोका सांगे ब्रह्मज्ञान .....! असा विचार जर कोणा वाचकाच्या मनात आला असेल तर थोडं थांबा..... कारण लेख लिहिणारा मी, हे लेखन स्वतः प्रात्यक्षिकाभिमुख स्वरूपात केले आहे.

मागच्या काही महिन्यांपूर्वी ' द मिरॅकल मॉर्निंग ' हे इंग्रजी पुस्तक माझ्या वाचनात आले. त्यात लेखकाने पहाटे म्हणजेच सकाळ मधले सामर्थ्य मोठ्या चमत्कृती पूर्ण रीतीने, अत्यंत सुंदर पद्धतीने मांडले आहे.जे आमच्या साधूसंतांनी सातशे वर्षांपूर्वी संत वाङ्मयाच्या माध्यमातून आम्हाला सांगितलेले आहे.साधुसंतांनी ' काकडा ' नावाच्या प्रकरणातून तुम्हा आम्हाला उठवले आहे.अर्थात जागे केले आहे. काकडा म्हणजे जागृती. हा काकडा भल्या पहाटे गायला जातो. कारण वारकरी संप्रदायात सकाळी काकड्यापासून साधकाच्या साधनेला सुरुवात होते. काकडा प्रकरणातील प्रत्येक शब्द हा भौतिक आणि पारमार्थिक जागृती करणारा आहे. त्यात साधुसंतांचा सकल मानव जाती बद्दलचा कळवळा प्रकर्षाने प्रतिबिंबित होतो.लोकांना उठवताना संतांनी म्हटले आहे...

**उठा जागे व्हा रे आता ..**

अर्थात आता म्हणजे अज्ञान रुपी अंधाराला चिरत येणाऱ्या सूर्योदयापूर्वी च्या या प्रभात समयाला तुम्ही जागे व्हायला हवे. केवळ लोकांनाच नव्हे तर संतांना सुद्धा जागे करण्याचे काम संतांनीच केले आहे. उठा साधुसंत साधा आपुले हित .. जाईल हा नरदेह मग कैसा भगवंत... संतांनी लोकांना जागे केले,संतांनी संतांना जागे केले,एवढेच नाही तर संतांनी देवाला सुद्धा जागे केले. त्यासंबंधीचे पुढचं अभंगचरण अत्यंत महत्त्वाचे आहे...

**उठा पांडुरंगा प्रभात समयो पातला ...**
**वैष्णवांचा मेळा गरुडा पारी दाटला ...**

पंढरीच्या विठुरायाला उठवताना वरील चरणात योजीलेला ' प्रभात समयो 'हा शब्द इथे जाणीवपूर्वक अधोरेखित करायला हवा. कारण संतांनी सुद्धा या ' प्रभात समयाचे ' अर्थात सकाळच्या वेळेचे महत्त्व जाणलेले आहे.हा प्रभात समय किंवा सकाळचा काळ किती महत्त्वाचा आणि मूल्यवान आहे, हे संतांनी आम्हाला सांगितले आहे.या सकाळ मध्ये अशी काही जादू आहे की, माणसाचा सबंध दिवस हर्ष,उत्साहात अन् आनंदात जातो. सकाळी लवकर उठणाऱ्याला आरोग्य प्राप्त होते.



चित्रे काढणे, नाणी संग्रहित करणे, वर्तमानपत्रातील लेखांची कात्रणे गोळा करणे, पोस्टाची तिकिटे गोळा करणे, क्रिकेट वा इतर खेळ पाहणे आणि खेळणे, गप्पा मारणे, नामस्मरण करणे, मृदंग, पेटी, तबला, गिटार, वाजवणे ...कविता लिहिणे, अशी कितीतरी छंद जोपासणे म्हणजे जीवनात आनंद भरणे होय.

अशी काही छंद मी माझ्या जीवनात जाणीवपूर्वक हट्टाने स्वतःला लावून घेतली आहेत. कधी हे छंद लावून घेताना आपण कंटाळवाणे होतो कधी त्या छंदात आपल्याला रुची नसते. परंतु सरावा अंती आपणाला हे छंद अगदी हवेहवेसे होऊन जातात. उदाहरणार्थ पुस्तके वाचण्याचा छंद हा समाजातल्या अधिकाधिक लोकात दिसून येतो. पण सातत्याच्या अभावाने तो छंद दुरावला जात नाही. दररोजची कामाची व्यग्रता आणि व्यस्तता तुम्हाला तुमच्या छंदा पासून दूर नेते.या विधानाशी मी अजिबात सहमत नाही. उलटपक्षी तुमच्या दररोजच्या व्यस्त कामातून व्यग्रतेतून काही वेळ काढल्यास तुम्ही कामाचा थकवा विसरून जाता. शिवाय वाचनात मन गुंतल्याने आपण मोबाईल पासूनही आपसूकच दूर होतो. जे दुरावणे हल्ली फार गरजेचे झालेले आहे. दिवसातील बराचसा काळ माझा वाचनात गेल्याने मी पुस्तकातील शब्दबध्द झालेल्या त्या सुंदर स्थळांना , स्वभावाची विविध पैलू असणाऱ्या माणसांना, निसर्ग सौंदर्याने बहरलेल्या गाव खेड्यांना, भल्या बुऱ्या प्रसंगांना, ऐतिहासिक स्थळांना, पाऊलवाटांना, डोंगर दऱ्याना, चांगल्या विचारांना अलंकार - समासादी व्याकरणातील चमत्कारांना अगदी नकळत भेटून येतो. त्यामुळे माझे मन प्रसन्न होते,आनंदून जाते. वाचनातून उत्साह जणू माझ्या नसानसातून ओसंडून वाहू लागतो. अन झपाटल्यागत मी पुस्तकांची पानावर पानं संपवून टाकतो. मग्नता, समरसता, या शब्दांचा खरा अर्थ मला पुस्तके वाचतानाच समजतो.

वाचन हे वाचकाला जणू पंचपक्वान्ननाने भरलेले ताटच असते. रुचकर जेवणाचा जसा चवी चवीने आस्वाद घेऊन आपण तृप्तीचा ढेकर देतो. अगदी तसंच चांगल्या पुस्तकातील चांगले विचार वाचताना सुद्धा आपण तृप्तीचाच ढेकर देत असतो.

छंदात समरस झाल्यानंतर व्यक्ती देहभान विसरून कसा जिवणानंद चाखत असते. हे वाचकांना कळावे यासाठी एक प्रसंग मला इथे आवर्जून नमूद करावासा वाटतो. माझे एक जवळचे चित्रकार मित्र आहेत. ते चित्रकलेचे प्रचंड रसिक आणि अभ्यासक आहेत. त्यांच्याकडे जेव्हा जेव्हा माझे जाणे होते; तेव्हा तेव्हा त्यांच्या खोलीत चित्रकलेचा कागद, विविध प्रकारच्या पेन्सिली, विविध रंग पेट्या, विविध रंगी खडू, विविध रंगाचे कुंचले व अशा बऱ्याच साहित्याचा पसारा मांडून ते बसलेले असतात. काहीतरी चित्र काढण्यात वा रंगवण्यात ते प्रचंड दंग असतात. हे दृश्य वर वर पाहू गेल्यास त्या खोलीतला तो साहित्याचा अस्ताव्यस्तपणा,तो सारा पसारा पाहून असे वाटते... अरे काय पसारा मांडून ठेवला आहे या माणसाने? पण हा माणूस दिवस दिवस एखादे चित्र काढताना,रंगवताना देह भानझालेला मी कैक वेळेला पाहिला आहे. त्याची ही साधना त्याला अत्युच्च आनंद देत असते. अगदी तहानभूक हरवून तो चित्र काढण्यात रमून गेलेला असतो. तेव्हा चित्रकलेच्या विविध आविष्कारांनी जणू तो अंतर्बाह्य तृप्त झालेला असतो. चित्रकलेच्या छंदा ने आनंदाच्या सागरात तो जणू न्हाऊन गेलेला असतो... म्हणून जीवन मातीमोल करणारी विविध 'व्यसनं ' टाळून जीवनातील रसास्वाद घ्यायला शिकवणारे हे 'छंद ' माणसाने जपले,जोपासले,सांभाळले तर दुःख, खिन्नता, उदासीनता रुपी जीवनाच्या या खडतर मार्गावरील त्याचा प्रवास नक्कीच आनंदी व सुखकर होईल यात यत्किंचितही संदेह वाटत नाही...

# माणूस: उत्क्रांतीवादाचे शिखर!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी


**डार्विनच्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धान्ताला त्याच्या काळापासूनच विरोध होत आला आहे आणि या विरोधात सनातन्यांनी कायम महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अनेक ज्ञानीगुणी जण आणि पुढारी यांनी देखील अलीकडेच उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला खोटे ठरवण्याचे प्रयत्न केलेत, त्यानिमित्ताने या विरोधांचा घेतलेला मागोवा. डार्विन आणि उत्क्रांतिवाद हे जणू एक समीकरणच मानले जाते. उत्क्रांती म्हणजे निसर्गानुसार सजीवांमध्ये होणारे आणि खूपच हळूहळू अंगिकारले जाणारे बदल होय. पृथ्वीच्या उत्पत्तीपासून होत आलेले हे बदल सजीवांच्या उदयास अनुकूल होते. चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा जन्म दि.१२ फेब्रुवारी १८०९ साली इंग्लंड येथील शोर्पशायर शहरातील श्रेब्स्बुरी या गावी झाला. ते एक ब्रिटिश पदार्थशास्त्रज्ञ आणि भूवैज्ञानिक होते.**

विज्ञानाच्या विकासात त्यांचे मोलाचे योगदान आहे. डार्विन हे प्रामुख्याने विज्ञानाच्या विकासात त्यांच्या योगदानासाठी जाणले जातात. त्यांनी मानवाच्या उत्क्रांतीच्या विविध टप्प्यांना साध्या सरळ प्रयोगांच्या माध्यमाने जगापुढे आणले. त्यांच्या निरीक्षणांमुळे उत्क्रांती आणि नैसर्गिक निवडीवर त्यांनी महत्त्वपूर्ण काम केले आहे. जेव्हा त्यांनी "प्रजातींच्या उत्पत्तीवर" प्रकाशित केले तेव्हा आपले जग कायमचे बदलले होते. डार्विनच्या नैसर्गिक निवडीच्या शोधाची व्याख्या चार तत्त्वांनी केली जाते. म्हणजेच, प्रत्येक प्रजातीमध्ये भिन्नता असते. या फरकांमध्ये रंग, वजन, उंची आणि इतर वैशिष्ट्ये यांचा समावेश आहे.

उत्क्रांती सिद्धांताचे महत्त्वाचे मुद्दे- १) एखाद्या विशिष्ट प्रजातीच्या अनेक प्रजातींच्या वनस्पती पूर्वी सारख्याच होत्या, परंतु जगातील विविध ठिकाणच्या भौगोलिक परिस्थितीमुळे त्यांची रचना बदलली त्यामुळे त्या एका प्रजातीच्या अनेक प्रजाती झाल्या. २) वनस्पतींसारख्या प्राण्यांच्या बाबतीतही असेच आहे, मानवाचे पूर्वज एकेकाळी माकडे होती, पण काही माकडे वेगळ्या पद्धतीने जगू लागली. हळूहळू गरजांनुसार त्यांचा विकास होत गेला, तो माणूस झाला. अशा रीतीने, वातावरण आणि परिस्थितीनुसार जीवांमध्ये हळूहळू बदल होणे किंवा अनुकूल कार्य करणे आणि परिणामी जीवांच्या नवीन प्रजातींची उत्पत्ती होणे, याला उत्क्रांती म्हणतात. चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांची डिसेंट ऑफ मॅन आणि ओरिजीन ऑफ स्पेशीज ही पुस्तके प्रचंड प्रमाणात प्रसिद्ध झाली. ऑन द ओरिजीन ऑफ स्पेसीज या पुस्तकातून त्यांनी उत्क्रांतिवादाचा सिद्धांत मांडला. त्यामुळेच २४ नोव्हेंबर हा दिवस डार्विन डे म्हणूनही प्रसिद्ध पावला आहे.

बीगल या जहाजावरून डार्विन परतला. तेव्हा त्याच्या डोक्यात विचारांची चक्रे फिरत होती. आपले विचार त्याने शब्दबद्ध करून त्याचे भूशास्त्रज्ञ गुरू चार्ल्स लायेल यांना दाखवले. त्यांच्या सल्ल्यावरून फापटपसारा छाटून ते त्याने पुन्हा लिहून काढले. हे विचार प्रसिद्ध करायचे धाडस चार्ल्स डार्विनमध्ये नव्हते. त्यांची पत्नी प्रचंड धार्मिक होती. त्यामुळे त्यांचे "जगण्यासाठी योग्य ते बदल ज्या प्राण्यांमध्ये घडतात आणि अशा तऱ्हेने बदल घडल्यामुळे जे प्राणी बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेऊ शकतात, तेच जगतात, बाकीचे कालौघात नष्ट होतात. ही प्रक्रिया कोट्यवधी वर्षे चालू असते", हे नवे विचार तिला धक्कादायक वाटणार, याबद्दल त्यांना खात्री वाटत होती. त्यामुळेच या विचारांचे साडेचारशे-पाचशे पानांचे हे हस्तलिखित त्यांनी बरीच वर्षे दडवून ठेवले होते. एक दिवस त्याला एक पार्सल मिळाले. अल्फ्रेड रसेल वॉलेस नावाच्या माणसाने डच इस्ट इंडिजमधून ते पाठवले होते. ते पुडके उघडून त्यातला मजकूर वाचून डार्विनला काय करावे ते सुचेना. त्याच्या सुमारे ५०० पानी प्रबंधाचे सार या वॉलेस नावाच्या स्वशिक्षित माणसाने त्याच्या निरीक्षणांचे निष्कर्ष म्हणून डार्विनकडे २४ पानांत पाठवले होते. आपण कृपया हे ब्रिटिश असोसिएशन ऑफ सायन्सेसच्या सभेत सादर करावे, अशी विनंती त्यासोबतच्या पत्रात होती. आता काय करावे, या पेचातून चार्ल्स लायेलनी पुढाकार घेऊन त्याची सुटका केली. नाहीतर डार्विन त्याचे हस्तलिखित जाळायला निघाला होता. तसे झाले असते तर हा सिद्धांत नंतर कधीतरी मांडला गेलाही असता आणि कदाचित तो सहजपणे स्वीकारलाही गेला असता, पण या झाल्या जर-तरच्या गोष्टी.


लायेल आणि डॉ.हुकर- जोसेफ डाल्टन



यांनी वॉलेस यांच्याशी संपर्क साधला. वॉलेसनी उदार मनाने हा सिद्धांत दोघांचा असावा, हे मान्य केले. मुख्य म्हणजे ह्या जोडगोळीनं जो सिद्धांत मांडला, त्यात माणसासंबंधी अवाक्षरही काढले नव्हते. अखेरीस एकदा हा शोधनिबंध दोघांच्या नावे १ जुलै १८५८ रोजी लिनियन सोसायटीच्या सभेत वाचला गेला. त्यानंतर डार्विनने 'द ओरिजिन ऑफ स्पेसीज थ्रू नॅचरल सिलेक्शन' हा ग्रंथ प्रकाशकाला छापण्यासाठी दिला. तो २४ नोव्हेंबर १८५९ या दिवशी बाजारात आला. त्याची पहिली आवृत्ती १२५० प्रतींची होती. ती पहिल्याच दिवशी हातोहात संपली. त्यानंतर जी वादविवादांना सुरुवात झाली ती अजून शमलेली नाही!

स्वर्गीय निर्मात्याच्या निर्मितीच्या तत्त्वाविरुद्ध असलेले पाखंडी पुस्तक असे मत क्वार्टर्ली रिव्ह्यूने या पुस्तकाबद्दल नोंदवले. तर तितक्याच एका नावाजलेल्या 'लिटररी रिव्ह्यू' या नियतकालिकाने अत्यंत किरकोळ आणि बिन महत्त्वाच्या थातुरमातुर घटनांच्या आधारे केवळ कल्पनाशक्ती आणि तर्कदुष्टता यांचा मेळ घालून निर्माण केलेले चोपडे, अशी या ग्रंथाची संभावना केली. खरे तर डार्विनने ओरिजिन ऑफ स्पेसीज या ग्रंथात मानवाच्या उत्पत्तीबद्दल लिहिणे टाळले होते. हे स्वतः डार्विनला डाचत होते. त्यामुळेच त्यांनी ग्रंथाच्या सुरुवातीलाच सर्व समविचारी शास्त्रज्ञांच्या संशोधनांची माहिती दिली होती आणि अखेरच्या प्रकरणात यामुळे माणसाच्या निर्मितीवर प्रकाश टाकण्यास मदत होईल, अशा अर्थाचे एक वाक्य टाकले होते.
या एका वाक्यामुळे लोकमत प्रचंड क्षुब्ध झाले. द एथेनिअम' या नियतकालिकाने एवढ्या एका वाक्याचे प्रचंड भांडवल केले. "माकडापासून माणूस बनला, अशा तऱ्हेचा एक नवा पंथ डार्विन तयार करणार", हा त्यांच्या बातमीचा मथळा होता. यानंतरचा मोठा वाद ब्रिटिश असोसिएशन ऑफ एडव्हान्समेंट ऑफ सायन्सेसच्या जून १८६०च्या सभेत झाला. डार्विनच्या विचारांना सॅम्युएल विल्बरफोर्स- बिशप ऑफ ऑक्सफर्ड डार्विनवादाला कायमस्वरूपी मूठमाती देणार, अशा तऱ्हेचं वर्णन सभेच्या आधीच वृत्तपत्रांनी छापले होते. सर्वसाधारणपणे वैज्ञानिक सभेकडे कुणी फिरकत नाही. मात्र या सभेला सातशेहून अधिक लोक त्या दिवशी मुख्य सभागृहात उपस्थित होते. अनेक लोक सभागृहाच्या बाहेर उभे होते. डार्विनची नेहमीप्रमाणे प्रकृती अस्वास्थ्याची- मंचावर जायच्या भीतीने डार्विनचं पोट दुखू लागायचे ही सबब आता लोकांना ठाऊक झाली होती. त्यामुळे टी.एच.हक्सले हे त्यांची म्हणजे डार्विनची बाजू मांडणार होते. बिशप बोलता बोलता हक्सले यांच्याकडे बघून म्हणाले, "तुम्हाला डार्विन यांचं म्हणणं मान्य आहे, तेव्हा मला एक बाब स्पष्ट करून सांगाल का? तुमचं माकडांशी असलेलं नातं वडिलांच्या घराण्याकडून आहे की आईच्या?" टाळ्यांचा कडकडाट झाला. थॉमस हक्सले शेजाऱ्याजवळ कुजबुजले, "देवानंच या बिशपला माझ्या जाळ्यात फसवलाय!"
बिशपचे भाषण संपले. हक्सली बोलायला उठले. त्यांनी आधी उपस्थितांना उत्क्रांतीवाद समजावून सांगितला. मग विल्बरफोर्सच्या युक्तिवादाचे बारा वाजवले आणि शेवटी ते म्हणाले, "आपल्याला ज्या विषयात गम्य नाही, ज्याची आपल्याला काडीचीही माहिती नाही, त्या विषयात नाक खुपसणाऱ्या एखाद्या वाचाळ माणसापेक्षा (इथं त्यांनी बिशप विल्बरफोर्सवर नजर रोखली.) एखादा माकड मी माझा पूर्वज म्हणून पसंत करीन." हक्सले यांच्या भाषणानंतर इंग्लंडमध्ये डार्विनवादाच्या विरोधात पद्धतशीरपणे वातावरण पेटवायचे प्रयत्न झाले. युरोपनं डार्विनवाद पूर्णपणे स्वीकारला नव्हता. लुई अगासीझसारख्या मान्यवर भूशास्त्रज्ञाने त्याला विरोध केलाच, पण ते अमेरिकेत व्याख्यान दौऱ्यासाठी गेले असताना त्यांनी डार्विनवादाविरोधात प्रचार केला. अमेरिकेतील दक्षिणी राज्यांनी ह्याविरोधाचे स्वागत केले. आजही अमेरिकेत डार्विनप्रणीत उत्क्रांतीवादाला जो विरोध होतोय तो ह्या सनातनी दक्षिण राज्यांमध्येच मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळतो. तिथे अजूनही फ्लॅट अर्थ सोसायटीसारख्या संस्था कार्यरत आहेत. अगासीझ यांनी डार्विनप्रणीत उत्क्रांतीवादाच्या विरोधात जे बीज पेरले, त्याला १९२५ साली दृश्य स्वरूपात फळ आले. टेनेसीमधील पुराणमतवादी लोकांच्या दबावाखाली राज्याच्या विधिमंडळाने एक कायदा अंमलात आणण्याचा ठराव मान्य केला. या कायद्याच्या मसुद्यावर दि.२१ मार्च १९२५ या दिवशी राज्यपालांची सही झाली. **क्रमशः**

# पन्नास वर्षांची अक्षर यात्रा



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**उतार वयात आपण जुने हिशेब चाळत बसतो. मागच्या काळात रमायला आवडते सत्तरी पार केलेल्या आमच्या सारख्यांना! सहज हिशेब करताना आठवले. आपली पहिली कादंबरी अंधारातल्या सावल्या १९७३ साली प्रसिध्द झाली. त्याला या वर्षी ५० वर्षे पूर्ण झाली! काळ असा चंद्र यानाच्या वेगाने धावतो. या निमित्ताने मागे वळून साहित्यिक प्रवासाची उजळणी करावीशी वाटली. तसे मी शाळेत असल्या पासून लिहायला लागलो. लेखन वाचनातून उगवते. शालेय जीवनात खूप वाचले.**

फडके, खांडेकर, स्वा सावरकर पासून, श्री ना पेंडसे, दळवी, नवरे, पु ल, अत्रे,गोखले, गाडगीळ, माडखोलकर असे सर्व काही.. सुरुवात कवितेपासून झाली असावी. ६६ साली नागपूरच्या एका मासिकात लेख प्रसिध्द झाला. पहिली कथा अनुराधा मासिकात ६८ साली प्रकाशित झाली.. मग तरुण भारत मध्ये लिहायला लागलो.. मी इंजिनियरिंगच्या तिसऱ्या वर्षाला असताना उन्हाळ्या च्या सुटीत पहिली कादंबरी लिहिली. ती तशीच पडून होती. पुढे मेनका, माहेर, वसंत, राजस, वसुधा, सुदर्शन अशा विविध मासिकातून कथा प्रकाशित व्हायला लागल्या. एक दोन कथा ना पारितोषक मिळाली. तेव्हा कॉन्फिडन्स वाढला. पुढे एम टेक झाल्यावर पहिली नोकरी मुंबईला लागली. त्या काळात प्रचंड वाचन..लेखन देखील वाढले..तेव्हा पेटीत पडून असलेले कादंबरी चे हस्तलिखित बाहेर काढले. अन् हिम्मत करून पुण्याला बेहेरे ( मेनका प्रकाशन) यांना दिले पाठवून.. साभार परतची वाट बघत राहिलो. पण आश्चर्य म्हणजे त्याचे स्विकृतीचे पत्र आले! माझा माझ्यावरच विश्वास बसेना. आधी मासिकातून अन् नंतर पुस्तक रूपाने कादंबरी प्रसिध्द होणार होती..त्यांनी काही सूचना केल्या होत्या. त्यानुसार किरकोळ बदल करून, पुनर्लेखन करून हस्तलिखित पाठवले. मेनका चे वैशिष्ट्य हे की मासिकातून कादंबरी प्रसिध्द होताच रसिक वाचकाची प्त्रे यायला सुरवात. माझ्या साठी हा अनुभव सुखद होता.. काही महिन्यातच पुस्तकाच्या प्रती कल्याण च्या पत्त्यावर मिळाल्या. मला स्वर्ग दोन बोटे उरल्या सारखे वाटले.

या यशाच्या झुल्यावर झुलत असताना मला नवी कल्पना सुचली. आय आय टी खरगपूर ला असताना मी माझ्या मित्र, मैत्रिणी ना नियमित पत्रे लिहीत असे.प्रथमच घर सोडल्याने आलेले एकटेपण विसरायचा तो एक प्रयत्न होता.या पत्राचे स्वरूप वेगळे होते.टी ख्याली खुशालीची पत्र नव्हती. विचाराच्या आदान प्रदाना तून स्वतःचे,अन् दुसऱ्याचे व्यक्तिमत्व घडविण्या चा तो एक प्रयोग होता.विज्ञान तंत्रज्ञान शिकताना नवनवीन प्रयोगा ची सवय झाली होती.लेखनात मी असे अनेक प्रयोग केले.पत्राच्या माध्यमातून लिहिलेल्या या कादंबरी चा जन्म कल्याणचा.आय आय टी ची पार्श्वभूमी असलेली मराठीतली एकमेव कादंबरी होती.शिवाय त्यात केवळ एकाच व्यक्तीची पत्रे होती. पत्रोत्तरे नव्हती. हाही नवा प्रयोग..हेही लिखाण मी बेहेरे यांनाच पाठवले..तेही त्यांनी ताबडतोब स्वीकारले.७४ साली आधी मासिकातून अन् नंतर पुस्तक रूपाने पत्रांजली कादंबरी प्रसिद्ध झाली.या कादंबरीला वाचकांनी, विशेष करून तरुणांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. शेकडो पत्र आलीत.अजूनही या कादंबरी चे चाहते भेटतात..आता मी मेनका प्रकाशन चा लेखक झालो होतो..यानंतर एका पाठपाठ एक कादंबऱ्या प्रसिध्द केल्या. मेनका चा वाचक वर्ग प्रचंड आहे.दाद देणारा आहे.कमीत कमी शब्दात योग्य ती संपादकीय प्रतिक्रिया देऊन लेखकाला प्रोत्साहन देत हवे तसे लिहून घेण्याचे कसब बेहेरे यांच्यात होते. मी त्यांना भेटलो देखील नव्हतो. सगळा व्यवहार पोस्ट ऑफिस द्वारे!ज्या प्रकारचे लेखन मेनकात येत असे, त्या प्रकृतीचे माझे लेखन नव्हते.तरी मी बेहेरे यांच्या मर्जितला लेखक होतो हे विशेष! आता विविध दिवाळी अंकात देखील माझ्या कथा प्रकाशित व्हायला लागल्या. दरम्यान नागपूर हून एक कादंबरी, कथा संग्रह प्रसिध्द झाला.मेनका बरोबर दिलीपराज प्रकाशन, अनघा, मेहता,साकेत असे प्रकाशक स्नेह वर्तुळात आलेत. मधल्या काळात नागपूरहून एक कविता संग्रह देखील प्रसिध्द झाला. तिथले विदर्भ लेखक संघाचे मामा गंधे यांनी एकाच व्यासपीठावर एकाच वेळी १०० कविता संग्रह प्रसिध्द करण्याचा जागतिक रेकॉर्ड केला.त्यात माझ्या संग्रहाला सुरेश भट यांच्या हस्ते पुरस्कार देखील मिळाला. एरवी शासकीय किंवा इतर पुरस्कार मिळाल्याचे भाग्य माझ्या कुठल्याही पुस्तकाला लाभले नाही हेही तितकेच खरे.माझ्या कुठल्याही पुस्तकाचे समारंभात प्रकाशन झालेले नाही. वाचकाचा मात्र उत्तम प्रतिसाद लाभला.माझे घर, पोटपाणी लेखनावर अवलंबून नव्हते.आपले लेखन जास्तीत जास्त रसिक वाचकापर्यंत पोहचावे हा एकमेव उद्देश. तो मला मिळालेल्या प्रकाशकांनी पूर्ण केला याचे समाधान आहे.




गेल्या काही वर्षात एकेक करून चांगली मासिके बंद झालीत.या साहित्यिक व्यवहारात,व्यापारात खोलवर जाण्याचे कारण नाही. पण लेखकांसाठी दरमहा चे व्यासपीठ बंद झाले हे खरे. त्यामुळे कथा लेखन दिवाळी अंकापुरते मर्यादित झाले. या बदलाला सामोरे जात मी वृत्त पत्रातले स्फुट लेखन वाढवले.आधीही लिहीत होतोच. पण गेल्या काही वर्षात सामाजिक, शैक्षणिक विषयावरचे लेखन वाढले.हा वाचक वर्ग वेगळा. त्यांची दाद देखील वेगळी.वृत्त पत्राची छाप, पोच सुध्दा वेगळी.मी कुठल्याही गटा शी संबंधित नसल्याने मटा,तरुण भारत,सकाळ, लोकसत्ता, लोकमत, सामना, देशोन्नती, पुण्य नगरी, पुढारी अशा सर्व प्रमुख पेपरात वेळोवेळी कमी अधिक प्रमाणात पण सातत्याने लिहिले. हे लिखाण महाराष्ट्रात काना कोपऱ्यात पोहोचले याचे समाधान आहे.

दोन वेगळ्या प्रयोगा विषयी लिहिणे गरजेचे आहे.१९९० या कादंबरीची कल्पना मी बेहेरे यांना ८९ अखेरीस दिली. दरमहा मी एक प्रकरण लिहिणार.त्या महिन्यात घडलेल्या ताजा घटनाची पार्श्वभूमी त्यात असणार. एका कुटुंबाची कथा.. त्याची फक्त रूपरेखा कळवली. नेमके कथानक कसे फुलेल, माहिती नाही.. कसे संपेल, माहिती नाही..तरी बेहेरे यांनी ही कल्पना उचलून धरली. त्यात रिस्क असूनही स्वीकारली.एरवी हातात हस्त लिखित नसताना कादंबरी स्वीकारणे म्हणजे गंमत नव्हे. पण बेहेरे याचा माझ्या लेखनावर विश्वास होता. हा प्रयोग यशस्वी झाला.यातली काही प्रकरण तर मी परदेशातून पाठवली आहेत!.. पुढे दहा वर्षानंतर हाच प्रयोग पुन्हा केला. त्याच कुटुंबाची दहा वर्षा नंतर ची कथा! हे लेखन ९९-२००० असे २४ महिने चालले! बेहेरे यांनी या प्रयोगाला महा कादंबरी असे नाव दिले! त्या काळात मेनका प्रकाशन बंद करण्याचे ठरत होते.आवरा सावर सुरू होती. पण माझ्या कादंबरीचे प्रपोजल आल्याने त्यांनी आपला निवृत्ती निर्णय पुढे ढकलल्याचे त्यांनीच मला सांगितले! बेहेरे यांनी प्रकाशित, संपादित केलेली माझी नव्या शतकाच्या उंबरठ्यावर ही शेवटची कादंबरी. त्यानंतर ते गेलेच.. माझ्या प्रत्येक संपादक,प्रकाशक यांच्या कडून मला काही न काही शिकता आले. अनुभव चांगले वाईट दोन्ही असले तरी ते मला समृद्ध करणारे होते. लेखनातून मिळालेले मानधन मोजण्याची मला कधीच गरज भासली नाही.. माझे वास्तव्य महाराष्ट्राबाहेर असल्याने कुण्याच संपादक,प्रकाशकांची भेट,बोलचाल कधी झाली नाही. सगळे व्यवहार पोस्टाचे..आपल्याकडे लेखक, प्रकाशक, संपादक यांच्यातील आर्थिक व्यवहार हे कधीच स्पष्ट नसतात. त्यात लॉजिक शोधण्यात अर्थ नसतो. सगळा एक तर्फी कारभार. प्रश्न आपले लेखन जास्तीत जास्त वाचका पर्यंत पोहोचावे हेच लेखकाचे उद्दिष्ट असते. त्यासाठी प्रकाशक, संपादक हे एकमेव साधन असते. मला सुदैवाने (काही अपवाद सोडल्यास) चांगले संपादक, प्रकाशक लाभले. त्यांची वितरण व्यवस्था छान होती.त्यामुळे महाराष्ट्र भर माझी पुस्तकं पोहोचली.. काना कोपऱ्यातून प्रतिसाद मिळाला. हेच माझे खरे मानधन मी समजतो. मी स्वतःला साहित्यिक वगैरे समजत नाही. मला कुठल्याही संमेलनाची निमंत्रणे येत नाहीत.लिहिताना संशोधन,अभ्यास,बैठक यात मी गुंतत नाही.जो लिहितो तो लेखक या व्याख्ये प्रमाण मी एक सामान्य लेखक आहे. तरीही माझ्या लेखनावर प्रेम करणारा,ते पुन्हा पुन्हा वाचणारा,आवडल्याचे आवर्जून कलाविणारा वाचक वर्ग मला लाभला आहे.हे मी माझे सद्भाग्य समजतो.काही दिवाळी अंकाचे संपादक सातत्याने आवर्जून माझे साहित्य दरवर्षी प्रसिध्द करतात याचा अभिमान वाटतो.

१२ कादंबऱ्या,१२ कथा संग्रह,८ लेख संग्रह,१ कविता संग्रह अशी एकूण ३३ पुस्तकं खाती जमा झालीत.दोन तीन येत्या काही महिन्यात प्रसिध्द होतील. )विविध मासिकातून ,वृत्त पत्रातून प्रकाशित लेखाची संख्या ५५०,कविता १५३,कथा २६५ असा एकूण लेखन प्रपंच! मुळात इलेक्ट्रॉनिक इंजिनियरिंग चे संशोधन,अध्यापन,शिवाय आस्थापन अशा प्रोफेशनल जबाबदाऱ्या सांभाळून केलेले हे लेखन आहे.त्यामुळे ही तारेवरची कसरतच म्हणावी लागेल. तोल सांभाळला गेला हे नशीब!

आता एकूणच पुस्तकं प्रकाशन क्षेत्रात मंदी आलीय.इथले व्यावहारिक,व्यावसायिक गणित पार बदललेले आहे.जुने जाणते प्रकाशक गेले. व्यवहार नव्या पिढीच्या हाती आले.त्यानेही फरक पडतोच.जोपर्यंत लेखक,प्रकाशक,संपादक यांचे सूर जुळतात नाहीत तोपर्यंत काही खरे नाही.याही क्षेत्रात व्यावसायिक कारणाने घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहे असे खेदाने म्हणावे लागते!

# छत्रपती शिवरायांच्या विश्रांतीमुळे पावन झालेला विश्रामगड

आधुनिक केसरी

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या वास्तव्याने पावन झालेला असा अकोले तालुक्यातील महत्वाचा दुर्ग म्हणजे पट्टाकिल्ला होय. निसर्गाचे भरभरून वरदान लाभलेल्या अकोले तालुक्यामधील बहुसंख्य अशा प्रेक्षणीय ठिकाणांपैकी एक, शेती भाती मधून प्रवास करत आणि अतिशय रमणीय असा वळणदार घाटरस्ता पार करत आपण पोहोचतो ते गडाच्या पायथ्याशी असलेल्या पट्टेवाडी गावात. आजूबाजूच्या पर्वतरांगा शी स्पर्धा करत समोरच दर्शन देतो तो किल्ल्याचा अजस्त्र डोंगर.. गडाच्या दर्शनाने आणि आल्हाददायक स्वच्छ हवेने आपला कितीही लांबच्या प्रवासाचा थकवा क्षणात नाहीसा होतो.**

पट्टागड शिवाजी महाराजांनी जिंकून घेतला. पट्टा किल्ल्याचा माथा म्हणजे एक मोठे पठारच आहे येथून अलंग, मदन, कुलंग, कळसूबाई, त्रिंबकगड हा सर्व परिसर नजरेत भरतो या सर्व परिसरावर नजर ठेवण्यासाठी या किल्ल्यांचा उपयोग होत असे शिवरायांनी हा किल्ला जिंकला. १६८२ साली औरंगजेबाने महाराष्ट्रात पदार्पण केले आणि मराठी मुलूख ताब्यात घेण्यास सुरवात केली. १६८८ साली मातबरखानाने बागलाणातील अनेक गड घेण्यास सुरवात केली होती पट्टागडा संबंधी मातबरखान औरंगजेबाकडे अर्ज पाठवतो त्यात तो म्हणतो. "सेवकाने काही दिवसांपासून १००० कोळी, भिल्ल, व मावळे यांचे पथक सैन्यात घेतले आहे मराठ्यांच्या ताब्यात असलेले पट्टा व इतर किल्ल्यालगतच्या जमीनदारांना रकमा पुरवण्यात आल्या आहेत ११ जानेवारी १६८८ ला खानाने काही पथके किल्ला घेण्याच्या मार्गावर धाडली मध्यरात्रीच्या सुमारास किल्ल्याच्या तटाला दोर लावून किल्ला जिंकून घेतला भगूरचा ठाणेदार गोविंदसिंग याची किल्ल्यावर नेमणूक करण्यात आली. पट्टागड त्यांना जिंकून घेतला. इ.स १६८६ पर्यंत हा सर्व परिसर मराठांच्या ताब्यात होता सह्याद्रीचे वर्णन करताना शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे म्हणतात की, "पौरूषाचा मूर्तिमंत साक्षात्कार म्हणजे सह्याद्रि. त्याच्या आवडीनिवडी आणी खोडी पुरूषी आहेत. त्याचे खेळणे-खिदळणेही पुरूषी आहे. कारण सह्याद्रि हा ज्वालामुखीचा उद्रेक आहे. अतिप्रचंड, अतिराकट, अतिदणकट अन् काळाकभिन्न." स्वराज्याच्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देत विश्रामगड आजही



दिमाखात उभा आहे. किल्ल्याच्या भोवतालचा निसर्गसमृद्ध परिसर आपल्याला भुरळ पडल्याशिवाय रहात नाही.सह्याद्रीच्या उत्तर दक्षिण रांगेची सुरुवात थळघाटाच्या पूर्वेकडे जाते याच रांगेला कळसूबाई रांग म्हणतात याच रांगेच्या पश्चिमेकडे अलंग, मदन, कळसूबाई तर पूर्वेकडे औंढ, पट्टा, बितनगड, आड हे किल्ले आहेत अलंग, मदन, कुलंग येथे असणारे घनदाट जंगल, दुर्गमवाटा यामुळे येथील किल्ल्यांची भटकंती फारच अवघड आहे तर औंढ, पट्टा, या परिसरातील भ्रमंती फारच सोपी आहे पट्टावाडीतून पायर्यांच्या वाटेने वर आल्यावर दोन गुहा लागतात. एक गुहा सध्या कुलुप लावून बंद केलेली आहे. दुसऱ्या गुहेत राहाता येते. या गुहेच्या पुढेही काही गुहा आहेत, पण वापरात नसल्याने त्र्यांधची अवस्था वाईट आहे. या गुहां जवळून जाणार्याक पायर्यां च्या वाटेने वर चढतांना दोनही बाजूचा कातळ छिन्नी हातोड्याने तासून गुळगुळीत केलेला दिसतो. मधे तटबंदीचे अवशेष दिसतात. पायर्यां चढून वर गेल्यावर उजवीकडे उत्तरमुखी प्रवेशव्दार दिसते. त्याची कमान आजही शाबूत आहे. प्रवेशव्दाराच्या उजव्या बाजूला बुरूज आहे. येथून एक वाट पट्टावाडीत उतरते. प्रवेशव्दार पाहून परत वरच्या दिशेने जातांना कातळात खोदलेल्या पायर्याज लागतात. येथे एक सातवाहन कालीन पाण्याचे टाके आहे. त्यातील पाणी पिण्यायोग्य आहे. या टाक्यापासून वर चढत गेल्यावर अष्टभुजा देवीचे मंदिर लागते या मंदिराचा अलीकडेच जीर्णोद्धार केला आहे. मंदिरा समोरून उजव्या बाजूने वर चढत गेल्यावर आपण एका प्रशस्त इमारतीपाशी येतो. या इमारतीला "अंबरखाना" म्हणतात. या इमारतीची बांधणी काळ्या घडीव दगडात केलेली असून आत प्रशस्त दालन आहेत. इमारतीचे छ्त घुमटाकार आहे. येथून वरच्या दिशेने चढत गेल्यावर आपण किल्ल्याच्या माथ्यावर येतो. पट्टा किल्ल्याचा माथा म्हणजे एक प्रशस्त पठारच आहे. माथ्यावरून दूरवर औंढा किल्ल्याचा सूळका दिसतो. या पठारावर उजव्या बाजूला ( औंढा किल्ल्याच्या दिशेला) गेल्यावर प्रथम पाण्याची दोन मोठी टाकी लागतात. त्याच्या पुढे काही गुहा लागतात. गुहांच्या पुढे गेल्यावर ओळीत खोदलेली पाण्याची टाकी लागतात, "बारा टाकी" म्हणून ओळखतात. येथून सरळ जाणाऱ्या वाटेने औंढा किल्ल्यावर जाता येते. बारा टाकी पासून परत फिरुन परत येतांना थोडे खालच्या बाजूस उतरून आल्यास अजून काही पाण्याची टाकी पाहायला मिळतात.पट्टाकिल्ला वर शिवसृष्टी उभारली असून येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अर्धपुतळा व मेघडंबरी बनवली आहे.

भाऊसाहेब वाकचौरे पाटील

# संविधान सभेत मोठ्या संख्येने सामील व्हा : वंचित तालुकाध्यक्ष दिलीप राव यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** भारतीय संविधान दिनानिमित्ताने समता, बंधुता, न्याय, राष्ट्रीय एकात्मता व धर्मनिरपेक्षता मूल्यांचा समाजामध्ये प्रचार-प्रचार व्हावा या हेतूने वंचित बहुजन आघाडीच्या वतीने वंचितचे राष्ट्रिय अध्यक्ष ॲड.प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या प्रमूख उपस्थीतीमध्ये संविधान दिनाच्या पूर्वसंध्येला शनिवारी (ता. २५) मुंबईत जाहिर सभा होणार आहे. तालुक्यातील मोठ्या संख्येनी उपस्थित रहावे असे आवाहन तालुका अध्यक्ष दिलीप राव यांनी केले आहे.

शिवाजी पार्क मैदान मुंबई येथे संविधान महा सभेचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी देशाला अर्पण केले. वंचित बहुजन आघाडीच्या वतीने वंचितचे राष्ट्रिय अध्यक्ष ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर, काँग्रेसचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष, खासदार राहूल गांधी यांच्या प्रमूख उपस्थितीत संविधान सन्मान महासभेचे आयोजन करण्यात आले आहे. संविधानाच्या सन्मानार्थ या जाहिर सभेस जिल्ह्यातील, तालुक्यातील तसेच परिसरातील संविधान प्रेमी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर हत्तीआंबिरे पालमकर, भोकर तालुकाध्यक्ष दिलीप राव, तालुका महासचिव व्यंकट वाडेकर, तालुका उपाध्यक्ष आनंदराव एडके,शहर अध्यक्ष शेख रहिम, महीला तालुकाध्यक्ष अनिताताई वाघमारे, उपाध्यक्ष गंगाधर कदम, भीम टायगर सेनेचे मिलिंद गायकवाड, राजेश चंद्रे, शिवाजी झंपलवाड, गणपत जाधव, सय्यद अल्ताफ, भारत बाई दुधारे, सुशिलाबाई दुधारे, शंकर गायकवाड,शेख सोहेल, शेख शबिर,आदिंसह तालुका वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.

# मोहन भागवत यांच्या हस्ते शांतिगिरीजी महाराज यांना पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**चाँदखाँ पठाण**

**खुलताबाद :** शांतीब्रह्म एकनाथ महाराजांचे वंशज यांच्या वतीने महाभागवत पुरस्काराने जगद्गुरु जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज पिठाचा सन्मान करण्यात आला.

श्रीक्षेत्र पैठण येथे चतुः शतकोत्तर रोपे -सुवर्ण महोत्सवा निमित्ताने शांतिब्रह्म एकनाथ महाराजांचे चौदावे वंशज हरिभक्त परायण श्री योगीराज महाराज गोसावी तथा नाथ महाराजांच्या परिवाराच्या वतीने जगद्गुरु जनार्दन स्वामी मौनगीराजी महाराज यांना भागवत कार्याच्या योगदानाबद्दल महाभागवत पुरस्कार देण्यात आला.जनकल्याणासाठी शांतिब्रह्म श्री संत एकनाथ महाराजांनी नाथ भागवत लिहिले नाथ भागवत म्हणजे भगवान श्रीकृष्णाने गीतेचे ज्ञान सांगितले ते सोप्या भाषेत माऊली ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या रूपाने प्रगट केले तेच ज्ञान संत एकनाथ महाराजांनी नाथ भागवताच्या रूपाने सोप्या भाषेत करून सांगितले अंधश्रद्धा निर्मूलन आणि अध्यात्मिक संस्कारातून राष्ट्र आणि समाज निर्मितीचे कार्य या नाथ भागवत ग्रंथामध्ये सांगितलेले आहे याचेच तंतोतंत पालन जगद्गुरु जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराजांनी स्वतःच्या आचरणातून आणि उपदेशातून समाजासमोर मांडण्याचे महान कार्य आपल्या संपूर्ण अवतार कार्यामध्ये केलेले आहे. भागवत ग्रंथ हा जगद्गुरु जनार्दन स्वामी महाराज यांनी माझा आत्मा आहे असे सांगितलेले आहे आणि त्यानुसारच लाखो भक्त परिवार अनुष्ठानाच्या माध्यमातून निर्वेसनी बनवुन क्रियाशील समाज राष्ट्रच्या सेवेसाठी तयार केला तेच कार्य पुढे उत्तराधिकारी महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरी महाराज यांनी पुढे चालू ठेवलेले आहे. या कार्याची दखल घेऊन नाथ बाबांचे वंशज यांनी पैठण येथे महाभागवत पुरस्काराने जगद्गुरु जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज यांना सन्मानित करण्यात आले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ मोहनजी भागवत यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार उत्तराधिकारी श्री श्री 1008 महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी स्वीकारला याप्रसंगी पैठण नगरी मधील श्रीनाथ महाराजांचे वंशज तथा वारकरी संप्रदायातील अनेक मान्यवर संत तसेच केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड, छत्रपती संभाजी नगरचे पालकमंत्री संदिपान भुमरे, माजी विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे नाना जय बाबाजी भक्त परिवाराचे



राजेंद्र पवार तथा असंख्य वारकरी बंधू आणि भगिनी यावेळी उपस्थित होते. या ऐतिहासिक प्रसंगी संस्थेचे सचिव श्री अविरमुक्तेश्वर महाराज, विष्णु महाराज, पुंजाराम पाटील गांगुर्डे, पोपट पवार, वसंत उबाळे, निलेश नागे, रमेश सागजकर या प्रमुख सेवकांसह जय बाबाजी भक्त परिवारातील असंख्य सेवक उपस्थित होते. या महान तपस्वी संतांच्या नावाने जगद्गुरु जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराजांना यांना हा पुरस्कार मिळाला हा बाबाजींच्या अध्यात्मिक आणि सामाजिक तथा भागवत भक्तीच्या सेवेचा गौरव आहे हा पुरस्कार उत्तराधिकारी म्हणून लाखो जय बाबाजी भक्त परिवाराचे प्रतिनिधी तथा गादीचे सेवक म्हणून आम्ही स्वीकारला आहे असे उत्तराधिकारी महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी म्हंटले आहे पुढे बोलताना शांतिगिरी महाराज म्हणाले की शांती ब्रह्म एकनाथ महाराजांच्या नावाने मिळालेला पुरस्कारामुळे आमची जबाबदारी आणखीनच वाढलेली आहे. भागवत धर्माची सेवा भागवत धर्माचा प्रचार प्रसार यातून सुसंस्कृत राष्ट्र निर्मितीच्या कार्यासाठी आम्ही संकल्प करीत आहोत पुरस्कारामुळे जनार्दन स्वामी पिठाचे उत्तराधिकारी म्हणून आमची व संपुर्ण लाखो जय बाबाजी भक्त परिवाराची अध्यात्मिक सामाजिक तथा राष्ट्रीय जबाबदारी आणखीनच वाढलेली आहे याची आम्हा सर्वांना जाण आहे. भागवत धर्माची पताका आणि अध्यात्मिक तथा राष्ट्रीय कार्य करण्यासाठी आम्ही यापुढे संपूर्ण ताकदीनिशी मोठ्या प्रमाणात सज्ज राहु असे शांतिगिरीजी महाराज यांनी बोलताना सांगितले अशी माहिती राजेंद्र पवार यांनी दिली.




# धर्माबाद येथे पहिल्यांदाच महर्षी वाल्मिकी जन्मोत्सव उत्साहात !

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** धर्माबादच्या इतिहासात यावर्षी पहिल्यांदाच रामायण हे महाकाव्य रचनारे आद्य कवी महर्षी वाल्मिकी यांचा जन्मोत्सव सोहळा आदिवासी कोळी महादेव समाजातर्फे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आदिवासी कोळी महादेव समाजाची जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते नागनाथ घिसेवाड, व्यंकट मुदीराज, गोविंद बोयने, गंगाधर कल्याणकर, राजू यादगिरीकर, शशिकांत भुसेवाड, मारुती पटाईत, सतिश मोटकुल यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली होती. सोमवारी सकाळच्या सत्रात आदिवासी कोळी महादेव समाजाचा ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला. तद्नंतर महर्षी वाल्मिकी मूर्ती पूजन व अभिषेक झाल्यानंतर सायंकाळीच्या सत्रात महर्षी वाल्मिकीच्या तैलचित्राची मिरवणूक शहरातील प्रमुख रस्त्यावरून



निघाली. यावेळी या मिरवणुकीतील पारंपारिक नृत्याने धर्माबाद शहरावाशीयांचे लक्ष वेधून घेतले होते. सायंकाळच्या सत्रात मान्यवरांचा सत्कार समाज भूषण व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना नागनाथ घिसेवाड यांनी आदिवासी कोळी महादेव समाजाच्या समस्या व उपाय योजना यावर आपल्या मनोगतातून प्रकाश टाकत जात वैधता प्रमाणपत्रासाठी येत असलेल्या अडचणी व इतर प्रश्नाबाबत लवकरच शासन व प्रशासनाविरुद्ध एल्गार पुकारला जाईल असा गर्भगळीत इशारा त्यांनी दिला. बाकीच्या मान्यवरांनी आपल्या मनोगतांतून वाल्मिकीच्या जीवनावर प्रकाश टाकताना वाल्मिकी ऋषी हे रामायणाचे रचनाकार म्हणून प्रख्यात असलेले ऋषी होते ते आदी कवी म्हणून प्रसिद्ध आहेत, रामायण एक महाकाव्य आहे जे प्रभू श्रीरामचंद्र यांच्या जीवनातून आपणास जीवनातील सत्य कर्तव्य साहस यांचा परिचय देते आणि आदर्श जीवन जगण्यास मार्गदर्शन करते. अशा वाल्या कोळ्यांनी संस्कृत भाषेत रामायणाची रचना केली त्यांनी लिहिलेले रामायण हे संस्कृत भाषेतील सर्वप्रथम महाकाव्य मानले जाते म्हणून वाल्मिकी यांना आद्यकवी असे सुद्धा समजले जाते हा इतिहास आपल्या बांधवांनी आपल्या जीवनात अनेक विधायक समाज उपयोगी कार्य करून जतन करावा असे आवाहन केले. आदिवासी कोळी महादेव समाज यांच्या एकजुटीतून पहिल्यांदाच एवढा मोठा वाल्मिकी जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी बाळापूर, रत्नाळी, धर्माबाद शहरातील देवी गल्ली, शंकरगंज, फुले नगर अति सर्वच प्रभागातील हजारो आदिवासी कोळी महादेव समाज स्त्रिया पुरुषासह उपस्थित होता. उपरोक्त कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आदिवासी समाज बांधवांनी परीश्रम घेतले आहे.

# माहेश्वरी समाजातील उच्चशिक्षित विद्यार्थ्यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षी देखील माहेश्वरी समाजातील पीएचडी, एम आर्च, एम टेक, सीए, एमबीबीएस, एमबीए, बीटेक, बीई, अशा उच्च शिक्षित विध्यार्थ्यांचा सत्कार गुरुवार दि 16 नोव्हेंबर रोजी कृष्णकुंज लाहोटी सभागृह येथे दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेशचंद्र बियाणी यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर माहेश्वरी महासभेचे अध्यक्ष प्रेमकिशोर मुंदडा हे होते. तर भगवानदास सोनी, अशोक लोया, सचिव राम लाठी, कार्यक्रमाचे प्रकल्प प्रमुख पुरुषोत्तम कालिया व महिला संघटनेच्या अध्यक्षा मंगल लड्डा यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक



भगवानदास सोनी यांनी केले.

लातूर माहेश्वरी महासभा या सेवाभावी संस्थेमार्फत माहेश्वरी समाजातील आर्थिक विवंचनेमुळे अडचणीत असलेल्या हुशार विध्यार्थ्यांना आर्थिक मदत करून त्यांना उच्च शिक्षित होईपर्यंत त्यांना सातत्याने मदत करण्याचे काम मागील दहा वर्षांपासून केले जाते. आतापर्यंत 55 विध्यार्थ्यांना 48 लाख रुपयांची मदत दिली गेली. मदत मिळालेल्या विध्यार्थ्यांपैकी 38 विध्यार्थी स्वतःच्या पायावर उभे राहिले असून, 38 कुटुंब स्वावलंबी झाली आहेत. हे संपूर्ण श्रेय समाजाचेच असल्याचे प्रकल्प प्रमुख भगवानदास सोनी यांनी सांगितले. लातूरमध्ये दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी लातूर माहेश्वरी महासभेद्वारे या विद्यार्थ्यांचा सत्कार करून, मानपत्र व पालकांना पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मीनाक्षी बांगड यांनी केले. गौरी रामेश्वर मालूच्या महेश वंदना गायनाने झाली. उपस्थितांचे आभार प्रेमकिशोर मुंदडा यांनी मानले. यावेळी अभय भुतडा यांचे पिताश्री रमेश भुतडा यांचा अभय भुतडा फाउंडेशनने रुग्णसेवेसाठी 21 लाखाची देणगी दिल्यामुळे मुख्य आथितींच्या हस्ते त्यांचाही सत्कार करण्यात आला.

# संविधानदिनी संविधान सन्मान दौडचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** संविधानाचा सन्मान, हाच आमचा अभिमान" "संविधानाचे आश्वासन, सर्वांना कायद्याचे संरक्षण" हा जयघोष करून भारतीय संविधान दिन अमृत महोत्सवी वर्षा निमित्त संविधान सन्मान दौड मिनी मॅरेथॉनचे आयोजन पुणे येथे करण्यात आलेले आहे.रविवार दिनांक २६ नोव्हेंबर २०२३ रोजी पहाटे ५.३० वाजता ही दौड सुरू होणार असून या दौड मध्ये सहभागी होण्यासाठी २२ नोव्हेंबर पूर्वी नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच प्रवेश विनामूल्य असल्याचे आयोजकांनी सांगितलेले आहे. विशेष म्हणजे या दौडमध्ये दिव्यांग बांधवांसाठी सुद्धा दिव्यांग व्हीलचेअर रेसचे आयोजन करण्यात आलेले आहे.या दौडचे आयोजन पुण्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),डॉ.बाबासाहेब आंबडेकर स्टडीज विभाग,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे जिल्हा हौशी ॲथलेटीक्स असोसिएशन आदींच्या वतीने करण्यात आलेले असून या दौड मध्ये मोठ्या संख्येने सहभाग होण्याचे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष परशुराम वाडेकर,डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) चे महासंचालक सुनील वारे आणि डॉ.बाबासाहेब आंबडेकर स्टडीज विभाग,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठचे विभाग प्रमुख डॉ.विजय खरे यांनी केलेले आहे.

या दौड साठी ३ किलोमीटर मुले मुली १६ वर्षाखालील,५ किलोमीटर मुले मुली १८ वर्षाखालील,१० किलोमीटर मुले मुली स्त्री पुरुष सर्व वयोगटांसाठी आदी वयोगटानुसार ग्रुप तयार करण्यात येणार आहेत.मोफत टीशर्ट देण्यात येणार आहे.शिवाय सहभाग घेतल्याबद्दल मेडल्स आणि सर्टिफिकेट दिले जाणार आहे.विजयी होणाऱ्या स्पर्धकांना प्रथम,द्वितीय,तृतीय क्रमांकाची पारितोषिके आणि सन्मानचिन्ह मुले आणि मुली दोन्ही गटातून वेगवेगळी देण्यात येणार आहेत. ३ किलोमीटरसाठी मुले आणि मुली यांना प्रथम पारितोषिक ३ हजार रुपये, द्वितीय पारितोषिक २ हजार रुपये,तृतीय पारितोषिक १ हजार रुपये तसेच ५ किलोमीटर साठी मुले मुली यांना प्रथम पारितोषिक ७ हजार रुपये,द्वितीय पारितोषिक ५ हजार रुपये, तृतीय पारितोषिक ३ हजार रुपये आणि १० किलोमीटर साठी मूले मुली प्रथम पारितोषिक १५ हजार रुपये, द्वितीय पारितोषिक १० हजार रुपये,तृतीय पारितोषिक ५ हजार रुपये आदी बक्षिसे देण्यात येणार आहेत. दौडचे स्थळ खाशाबा जाधव क्रिडा संकुल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे हे असणार आहे. अधिक माहितीसाठी ९८२२४८३७१४, ९३७३८८७११२,९८५०१११७१० आदी क्रमांकाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे.

# पालकमंत्री साहेब रस्त्याचे आरोग्य कधी सुधारणार!

## वाहनांच्या नुकसानी बरोबरच पाठ, मणक्यांचे आजार

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** जिल्ह्यातील भूम-परंडा-वाशी या मतदारसंघाला जोडणारे सर्वच रस्त्यांचे आरोग्य अतिशय खालावलेले आहे. त्याबद्दल कोणीच काही बोलत नसल्याने जनसामान्यातून नवल व्यक्त केले जात आहे.प्रशासन रस्ता दुरुस्तीसाठी मुहूर्त कधी काढणार आहे. खड्ड्यांमुळे वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. वाहनांच्या नुकसानी बरोबरच पाठ, मणक्यासारखे आजार या खड्ड्यातील रस्त्यावर प्रवास करण्यामुळे वाढत असल्याने आरोग्याची व्याधी कायमची मागे लागत असल्याने,"यासाठीच,आरोग्यमंत्र्यांकडून शासकीय रुग्णालयात उपचार मोफत केले"असावेत असाच त्रस्त वाहन चालकांचा बोलण्याचा सूर आहे. कारण वाशी वरून कुंथलगिरी मार्गे भूमला एसटी बसने, टू व्हीलर वर, फोर व्हीलर ने जाणाऱ्या व्यक्तीला भूम मध्ये पोचल्यावर एखाद्याने प्रवास कसा झाला ? असे विचारल्यास,नक्कीच तो प्रवास करणारा त्रस्त व्यक्ती आरोग्यमंत्र्यांनी मोफत केलेल्या शासकीय दवाखान्यातून मणक्यासाठी मोफत औषध ते धाव घेईल. तसेच परंड्याहून वारदवाडी मार्गे भूमला येणाऱ्यांची सुद्धा हीच अवस्था, वाशी तालुक्यातून कळंब तालुक्याकडे दळणवळणासाठी किंवा आर्थिक व्यवहारासाठी तसेच नातेवाईकाकडे जाणाऱ्यांना तर काही नाही बोललेलेच बरे कारण अठरा विश्व दारिद्र्य रोडच्या माथी मारल्या गेल्याचे चित्र आपणास पाहावयास मिळते. खुद्द साखरसम्राट यांच्या वाशी व सोनारी येथील साखर कारखान्याला ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनधारकास जरी रस्त्याच्या आरोग्य बाबत विचारले तर इथे खूप काही सांगून जाईल. गेला अनेक दशकांपासून परंडा तालुक्याला जोडले गेलेल्या खेडे गावांचे रस्त्याची अवस्था, भूम तालुक्यातील रस्त्यांची अवस्था आणि वाशी तालुक्यातील रस्त्यांची अवस्था ही कायम खड्ड्यातूनच प्रवास करण्यासारखी शिल्लक राहिली असल्याने कार्यसम्राट आरोग्य मंत्री साहेब मतदारसंघांमध्ये नवीन शासकीय दवाखाने उभे





करत आहे. गेली पंधरा वर्षे तर त्याच मतदारांनी कुठल्याही रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन कधी पाहिले नसल्याचं जाणकारांमधून बोलले जात आहे. अन जिथे कुठे रस्त्याचे भूमिपूजन झालं ते अतिशय निकृष्ट दर्जाचे रस्ते बनवण्यात आले आहेत. पुढे रस्त्याचे काम चालू असतानाच पाठीमागे खड्डे पडत राहत गेले. कुठे रस्ते बनवले तर साईट पट्ट्यावर मुरूम न भरतात बिले उचलले असल्याची चर्चाही नागरिकांमधून बोलले जात आहे. याचाच फायदा माढा मतदारसंघातून काढता पाय घेत साखर उद्योगाचे जाळे मतदारसंघात पसरवून शेतकऱ्यांना व जनसामान्यांना जाहीर आश्वासन देत सध्याचे विद्यमान पालकमंत्री व आरोग्य मंत्री तानाजी सावंत वाशी भूम परंडा या मतदारसंघातून भरघोस मतांनी निवडून आले खरे मात्र त्यांनी जनतेला दिलेले आश्वासन साफ फोल ठरली असल्याने त्यांच्या बाबतही जनतेमधून नाराजीचे चित्र सध्यातरी पहावयास मिळत आहे. त्यातच आमदार राहुल मोटे यांनी बाणगंगा साखर कारखाना विद्यमान उपमुख्यमंत्रीअजित (दादा) पवार त्यांच्याकडे करारा वरती चालवण्यासाठी दिला आहे. महाराष्ट्रासाठी त्यांनी तयार केलेले बारामती मॉडेल हे सध्या चर्चेचा विषय बनला आहे. महाविकास आघाडीमध्ये असताना खुद्द अजित दादा पवार यांनीच आवर्जून भूम परंडा वाशी मतदारसंघातील एसटी बसची अवस्था व तिचे फोटो विधानसभेत मांडणे म्हणजे दादांचं या मतदारसंघाबाबत पार्थ पवार साठी चाचपणी सुरु आहे. सद्या तरी असेच चित्रं आहे. दादांचे मतदारसंघात अधून मधून येणे जाणे वाढल्याने उद्या बारामतीकरांनी त्यांच्याच घरचा उमेदवार येथे दिला तर गेल्या अनेक दशकांपासून विकासापासून कित्येक दूर फेकले गेलेल्या या भूम-परंडा-वाशी मतदारसंघांतील जनतेने बारामती प्रमाणेच या मतदारसंघाचाही रूपड पालटण्यासाठी अजित दादा सोबत जाणारं की पालकमंत्री विकासाचा करिष्मा करून मतदारसंघातील जनतेची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न करतील हे येणाऱ्या काळात कळेल.

# विश्व हिंदू परिषदेच्या वतीने 'निमंत्रण संपर्क अभियान'

आधुनिक केसरी न्यूज




**पुणे :** अयोध्येत प्रभू श्रीरामांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा २२ जानेवारी २०२४ रोजी होत आहे. यानिमित्त विश्व हिंदू परिषदेच्या वतीने येत्या १ ते १५ जानेवारी या कालावधीत 'निमंत्रण संपर्क अभियान' राबविण्यात येणार आहे. पौष शुक्ल द्वादशी, विक्रम संवत् २०८०, अर्थात सोमवार, २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येत साकारण्यात आलेल्या भव्य राममंदिरात प्रभू श्रीरामांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा पंतप्रधान मोदींच्या हस्ते होणार आहे. या निमित्ताने संपूर्ण देश पुन्हा राममय व्हावा, या हेतूने विश्व हिंदू परिषदेने अभियान आयोजित केले आहे. कोट्यवधींना प्रत्यक्ष अयोध्येत जाऊन सोहळ्यात सहभागी होणे शक्य होणार नाही, त्यामुळे आपल्याच भागात हा मंगलमय सोहळा साजरा व्हावा, या दृष्टीने हे अभियान आहे. अभियानाचा प्रारंभ ५ नोव्हेंबर रोजी अयोध्येत झाला. श्रीराम जन्मभूमी मंदिराच्या भव्य वास्तूच्या गर्भगृहात अक्षतांचे पूजन व अभिमंत्रण करण्यात आले. या कार्यक्रमास भारताच्या सर्व प्रांतांतून विश्व हिंदू परिषदेचे प्रतिनिधी उपस्थित होते. या सर्व प्रतिनिधींकडे पूजित व अभिमंत्रित अक्षतांचे कलश सुपूर्द करण्यात आले आहेत. हे कलश घेऊन सर्व प्रतिनिधी आपापल्या प्रांतांत परतले. पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या वतीने सहमंत्री अॅड. सतीश गोरडे व प्रांत समरसता सहप्रमुख निखिल कुलकर्णी यांनी कलश स्वीकारला. सकाळी १०.०० वाजता ही कलश यात्रा लाल महाल चौक, फरासखाना चौक, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर, समाधान चौक, रामेश्वर चौक, गोटीराम भैय्या चौक, गाडीखाना, शाहू चौक, राष्ट्रभूषण चौक, स्वारगेट अशी जाईल. समारोप श्वेतांबर जैन मंदिर, दादावाडी येथे होईल. श्रीराम प्रतिमा विराजमान असलेल्या रथावर मोठा चार फूट कलश, पारंपरिक वाद्ये, ढोल-ताशा पथक, शंखनाद पथक यात सहभागी असतील. प्रत्येक शंभर मीटर अंतरावर सार्वजनिक मंडळे, संस्था यांच्यामार्फत यात्रेचे स्वागत केले जाईल. याबरोबरच शक्य असेल तेथे अयोध्येतील कार्यक्रमाचे मोठ्या पडद्यावर या सोहळ्याचे प्रक्षेपण करावे. हिंदू भक्तीपद्धतीला अनुसरून शंखध्वनी, घंटानाद, रामनाम जप, सुंदरकांड पाठ, हनुमान चालिसा व रामरक्षास्तोत्र पठणदेखील सामूहिक पद्धतीने करावे. २२ जानेवारीला प्रत्येकाने संध्याकाळी घराबाहेर दिवा, दीपमाळा व पणत्या लावून पुनश्च दीपावली साजरी करावी, असेही आवाहन या संपर्क अभियानात करण्यात येईल. मंदिरांचे सुशोभीकरण केले जाईल व गल्लोगल्ली भगव्या पताकांच्या माळा व घराघरांवर भगवे ध्वज लावले जातील. या निमित्ताने सर्व हिंदू एकत्र येऊन राममंदिर निर्मितीच्या स्वप्नपूर्तीचा अनुभव घेतील.

# भोकरला मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** भोकर विधानसभा मतदारसंघ संघातील मतदार यादितील आवश्यक असलेल्या बदल करण्याच्या संदर्भात निवडणूक आयोगाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. मतदारांनी सदरील कार्यक्रमास सहकार्य करावे असे आवाहन उपविभागीय महसूल अधिकारी सचिन यादव यांनी केले आहे.



भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या निर्देशानुसार १जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकानुसार आधारीत मतदार यादीचा पूनरीक्षण कार्यक्रम सुरू आहे.सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने भोकर विधानसभा मतदारसंघातील प्रारूप मतदार यादी ८५ भोकर विधानसभा मतदार केंद्रावर सोमवारी (ता.२७) प्रसिद्ध करण्यात आली आहे. १ जानेवारी २०२४ विशेष शिबिर आयोजित करण्यात आले आहे. शनीवारी (ता. २५) व रविवारी (ता.२६) भोकर विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रावर संबंधित केंद्र स्तरीय अधिकारी यांच्या मार्फत नवीन मतदाराची नोंदणी,वगळणी कींवा मतदार यादीतील तपसीलात दूरूस्तीसाठी नमुना ६,७,८ फार्म भरून घेतले जाणार आहेत. जनतेनी मतदान केंद्रावर जाऊन सदरील अर्ज भरून घ्यावे, असे अहवान उपविभागीय महसूल अधिकारी यांनी केले आहे.

# धारतीर्थ स्नानास खुले करा अन्यथा आत्मदहन; डॉ. गोपाल बच्छीरे

आधुनिक केसरी न्यूज




**लोणार :** धारतीर्थ खुले होण्यासाठी डॉ. गोपाल बच्छिरे यांनी दिला आत्मदहनाचा इशारा लोणारचे पावन धारतीर्थ लोणी यात्रा सुरू होण्याच्या अगोदर श्रद्धा स्नानासाठी खुले करा अन्यथा आत्मदहन करून असा इशारा शिवसेना उ.बा.ठा. चे जिल्हा संघटक, मराठवाडा इतिहास परिषदेचे उपाध्यक्ष, औरंगाबाद हिस्ट्री सोसायटीचे सचिव व इंडियन हिस्ट्री काँग्रेसचे सदस्य डॉ. गोपाल बच्छिरे यांनी जिल्हाधिकारी तथा पुरातत्व विभागास दिले. लोणारचे विरज धारतीर्थ हे श्रद्धा स्नानासाठी खुले करण्या करिता अनेक आंदोलन झाली उपोषण झाली. सविनय कायदेभंग करून तीर्थस्थान केले परंतु शासन व प्रशासन यांना त्याचे गांभीर्य नाही म्हणून उपजिल्हाधिकारी दिनेश गीते यांच्या माध्यमाने जिल्हाधिकारी अधीक्षक पुरातत्व विभाग यांना निवेदनाद्वारे इशारा दिला.

लोणारची विरजधार तीर्थ स्नानासाठी बंद करण्याचे असे कोणतेही पुरावे पुरातत्त्व विभागाकडे नाहीत हे सर्व तोंडी त्यांच्या न्यायालयीन मित्रांनी सुचवल्यामुळे हा खटाटोप पुरातत्व विभाग करत आहे व हा गुन्हा आहे. संविधानातील आर्टिकल 25 चे सरळ सरळ उल्लंघन आहे उच्च न्यायालयाच्या 1944 च्या निर्णयाचा अवमान आहे याविषयीचे सर्व न्यायालयीन पुरावे त्याचबरोबर पुरातत्त्व विभागाच्या नियमावली त्यानुसार जिल्हाधिकारी हे निर्णय घेऊ शकतात याविषयीचे पुरावे जिल्हाधिकाऱ्यांना देऊन लोणी यात्रा सुरु होण्याच्या अगोदर लोणारचे धारतीर्थ हे तीर्थस्नानासाठी खुले करा लोणी यात्रेच्या वेळेस महाराष्ट्रभरातून लाखो भाविक हे लोणार येथील धारतीर्थावर तीर्थ स्नान करतात व त्यानंतरच लोणी येथील सखाराम महाराज यांच्या दर्शनासाठी जातात या श्रद्धाळू यांच्या येण्यामुळे लोणारचे व्यवसाय त्यात रिक्षा चालकापासून तर हॉटेल मालकापर्यंत सर्वांचे व्यापार उद्योग चांगल्या प्रकारे चालतात त्या माध्यमाने लोणारचा विकास होतो. या सर्व बाबी डोळ्यासमोर ठेवून लोणारचे धारतीर्थ येत्या लोणी यात्रेपूर्वी हे धारतीर्थ खुले करा अन्यथा आत्मदहन करू व याची संपूर्ण जबाबदारी ही शासन व प्रशासनावर असेल असा इशाराच डॉ. गोपाल बच्छिरे यांनी प्रशासन व पुरातत्त्व विभागाला दिला. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहरप्रमुख गजानन जाधव उपस्थित होते.

# घोटी खुर्द येथे पतीनेच केली पत्नीची हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** घोटी खुर्द येथे पती पत्नीच्या किरकोळ वादातून पतीने लोखंडी पहार डोक्यात मारून पत्नीची हत्या केली. याबाबत वाडीवऱ्हे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सहायक पोलीस निरीक्षक समीर बारावकर यांनी तातडीने तपास करून १२ तासांच्या आत आरोपीला शिताफीने अटक केली आहे. घोटी खुर्द येथे मंगळवारी २१ नोव्हेंबरला मध्यरात्री मुकुंदा हरी वाघ व त्याची पत्नी सुमित्रा मुकुंदा वाघ, वय ३८ यांचा दारू पिण्याच्या कारणावरून वाद झाला. या वादातून दारूच्या नशेत असणाऱ्या मुकुंदाने रागाच्या भरात लोखंडी पहारीने पत्नी सुमित्राच्या डोक्यात जोरदार प्रहार करत तिचा खून केला. ती रक्ताच्या थारोळ्यात पडलेली बघून पती मुकुंदा हरी वाघ याने तिथून तात्काळ पळ काढला. पोलिसांनी तपासाची चक्र वेगाने फिरवत संशयित मुकुंदा हरी वाघ यास पळून जाण्याच्या तयारीत असताना अटक केली.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी) • त्वचा व गुप्त रोग • वजन वाढविणे
• आम वात उदर रोग • स्त्रीयांचे आजार • वजन कमी करणे
• दमा व अॅलर्जी (जुनाट) • स्थूलपणा, मूळव्याध • केसांच्या सर्व तक्रारी
• चिकन गुनिया • वंध्यत्व, संतती प्राप्ती • लहान मुलांची
• मनोकयीक आजार • कॅन्सर सल्ला, मुतखडा • स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

## कार्तिकीनिमित्त संतनगरीत हजारो भक्तांची मांदियाळी

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** गजानन महाराजांचे लाखो भक्त त्यांच्यातच विठुमाऊलीला बघतात. कार्तिकी एकादशीला जे भाविक व वारकरी पंढरपूरला जाऊ शकत नाही, ते दरवर्षी शेगावात दाखल होऊन श्रीचरणी नतमस्तक होतात. यंदाची कार्तिकीदेखील या अलिखित परंपरेला अपवाद नाही. यातच एकादशी व गजानन महाराजांचा दिवस गुरुवार एकत्र आल्याने जिल्ह्यासह राज्याभरातून हजारो आबालवृद्ध भाविक विदर्भपंढरीत दाखल झाले. बुधवारी रात्रीपासूनच मंदिर परिसर व मंदिराकडे जाणारे मार्ग भाविकांनी नुसते फुलून गेले. जिल्ह्यासह दूरवरून येणाऱ्या दिंड्याचे कालपासूनच शेगावी आगमन व्हायला सुरुवात झाली. आज, गुरुवारी सकाळपर्यंत सुमारे १५० दिंड्या संतनगरीत दाखल झाल्याचा अंदाज आहे.संत गजानन महाराज संस्थान मंदिरात आज दिवसभर कार्तिकी एकादशीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. गजानन महाराज समाधीस्थळ दर्शनासाठी आज पहाटेपासूनच भाविकांच्या दीर्घ रांगा लागल्या. दर्शनासाठी किमान दोन ते अडीच तास लागत असून मुख दर्शनासाठी देखील तासाभराचा अवधी लागत आहे.



**खासदार प्रतापराव जाधव व शांतनु मापारी यांच्या वाढदिवसानिमित्त लोणार येथे भव्य शंकरपटाचे आयोजन करण्यात आले. तब्बल वीस वर्षांनंतर या पटाचा आनंद लोणारकरांनी घेतला. यावेळी सचिन कापूरे यांनी घेतलेले छायाचित्र...**

# कुणबी मराठा तरुण अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ योजनेच्या लाभापासून वंचित

## शैलेश सरकटे : तरुणांना महामंडळमार्फत तत्काळ कर्ज वितरण करा

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** मराठा समाजात सुशिक्षित बेरोजगार आर्थिक दृष्टया मागास असलेल्या घटकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या समाजाचा सामाजिक व आर्थिक विकास करून समाजातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांकरीता वस्वयं रोज़गाराच्या संधी उपलब्ध करून देण्याकरीता अन्नासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली खरी मात्र या योजनेच्या लाभापासुन विदर्भातील ११ जिल्ह्यामधील कुणबी (मराठा) तरुणांवर मात्र वंचित राहायची वेळ आली आहे.
मनोज जरांगे पाटिल यांच्या आंदोलना नंतर राज्यभरात मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात येत असल्याने राज्य सरकारने देखील अण्णा साहेब पाटिल आर्थिक मागास विकास महामंडळ योजेनेच्या नियमातबदल करून विदर्भातील कुणबी प्रमाणपत्र असलेल्या मराठा समाजातील सुशिक्षित बेरोजगार युवकाना या योजनेचा लाभ तात्काळ लागू करून देण्यात यावा अशी मागणी वढव जिल्हा परिषद सर्कल मधील युवा नेते शैलेश सरकटे यांनी आमदार डॉ.संजय रायमुलकर यांच्या मार्फ़त निवेदनाद्वारे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कड़े केली आहे. विदर्भातील मराठा समाजातील तरुणांकड़े कुणबी प्रमाणपत्र असूनही या तरुणांना स्वयं रोजगार करीता अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ योजनांचा लाभ घेता आला नाही.राज्यात मराठा आरक्षणचा विषय ऐरणी वर आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे ही मागणी सर्व स्थरातून होत आहे. ही



मागणी होत असताना मराठा आणि कुणबी एकच आहे याचे पुरावे मोठ्या प्रमाणत सापडत आहे. आपल्या महाराष्ट्र शासनाने काही वर्षा आधी मराठा तरुण स्वतःच्या पायावर उभे रहावे व त्यांना उद्योग व्यवसाय करतायावा यासाठी शासनाच्या वतीने आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ ची स्थापना करण्यात आली. त्यामार्फत मराठा तरुणांना योजनेच्या माध्यमातून वैयक्तिक कर्ज वितरित करने सुरु केले.परंतु अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ ची योजना राबवित असताना विदर्भातील कुणबी तरुणांना यामहामंडळा मार्फत कर्ज वितरित केले जात नाही. अर्ज करतांना त्यांवर मराठा ही अट आहे.परंतु आता मराठा समाजाला सरसकट कुणबीचे प्रमाणपत्र देण्यात येत असल्याने विदर्भातील कुणबी मराठा समाजातील सुशिक्षित बेरोजगारांना बुलढाणा,वाशिम,अकोलासह ११ जिल्ह्यातील तरुणांना याचा लाभ होईल. व तरुण वर्ग स्वतःच्या पायावर उद्योग व्यवसाय करून उभा राहील त्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आगामी हिवाळी अधिवेशन आधी या नियमात बदल करण्याचा निर्णय घेतल्यास विदर्भातील ११ जिल्ह्यमधील लाखो सुशिक्षित बेरोजगार युवकाना या योजनेचा लाभ होईल, असेही सरकटे यांनी यावेळी आ. डॉ. संजय रायमुलकर यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे. यावेळी शिवसेना तालुका प्रमुख भगवान सुलताने हे उपस्थित होते.

## पाण्यासाठी जांभुळपाडा रस्त्यावर आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** सुरगाणा तालुक्यातील जांभुळपाडा (दा) पाच ते सहा महिन्यांपासून भीषण पाणी टंचाईला तोंड देत आहे. महिलांना जंगलातील झिऱ्यावर पाण्यासाठी जावे लागत आहे. गावात टँकरव्दारे पाणी देण्याच्या मागणीसाठी परिसरातील महिलांनी एकत्र येत मुख्य रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन करुन हंडे वाजवले. नाशिक जिल्ह्यातील पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर या आदिवासीबहुल तालुक्यांमध्ये पावसाळ्यात मुबलक पाणी आणि पावसाळा संपल्यानंतर टंचाई, असे चित्र दरवर्षीचे आहे. या तालुक्यांमध्ये पुरेशा प्रमाणात धरण, तलाव, बंधारे नसल्याने दरवर्षी आदिवासी बांधवांना टंचाईला सामोरे जावे लागते. या टंचाईवर कायमस्वरुपी उपाय करण्याऐवजी तात्पुरते उपाय केले जातात. त्यामुळे टंचाईची समस्या कायमच राहते. उन्हाळ्यात तर टंचाईचे स्वरुप अधिकच गंभीर होते. केवळ पाणी मिळविण्यातच ग्रामस्थांचा संपूर्ण दिवस वाया जातो. गावाजवळ पाणी मिळत नसल्यास दूर जंगलातून पाणी आणावे लागते. कायम टंचाईला तोंड देणाऱ्या सुरगाणा तालुक्यातील अनेक गावांपैकी जांभुळपाडा एक आहे. जांभुळपाड्यातील महिलांना पिण्याचे पाणी मिळवण्यासाठी जंगलात पायपीट करावी लागत आहे. सोमवारी सकाळी काही महिला पाणी भरण्यासाठी जंगलात गेल्या असता त्यांना अचानक बिबट्या दिसला. बिबट्याला पाहताच महिला हंडे टाकून गावाकडे पळाल्या. आरडाओरड झाल्यानंतर सर्व ग्रामस्थ जमा झाले, सर्वांनी एकत्र येत रस्ता अडविण्याचा निर्णय घेतला. रस्त्यात हंडे ठेवून महिलांनी रास्ता रोको केला.

## काल्याच्या कीर्तनाला गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**बाजारसावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे रेणुकामाता मंदिर परिसरात झालेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या शेवटच्या दिवसी काल्याचे किर्तन तथा भंडारा महाप्रसादासाठी कधी नव्हे, अशी प्रचंड गर्दीचे चित्र होती. कार्तिक शु १ दि.१४ रोजी अखंड हरिनाम सप्ताह तथा श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळाचे आयोजन करण्यात आले होते. तर कार्तिक शु ९ दि.२१मंगळवारी सप्ताहची सांगता करण्यात झाली. सप्ताहात हभप पांडुरंग महाराज, उध्दव महाराज, उध्दव महाराज महाडिक, माणिक महाराज, तुकाराम महाराज,चांगदेव महाराज, संजय महाराज आदी नामांकित हभप महाराजांचे दररोज कीर्तन झाले. तर शेवटच्या दिवसी ह.भ.प. संजय महाराज पाचपोर यांच्या काल्याचे किर्तनासाठी प्रचंड गर्दी करून सावंगीकरांचे भाविक भक्तांनी डोळ्यांचे पारणे फेडले.

## जयक्रांती समता दिंडीचे मा.आ. रोहिदास चव्हाण यांच्या वतीने स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** भाई केशवराव धोंडगे यांच्या प्रेरणेतून सुरु झालेल्या जयक्रांती समता दिंडीचे लोह्यात माजी आमदार तथा लातुर जिल्हाचे शिवसेना संपर्क प्रमख रोहीदास चव्हाण यांच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले.
माजी खासदार व माजी आमदार थोर स्वातंत्र्यसेनानी डॉ.भाई केशवराव धोंडगे यांनी २००८ रोजी जयक्रांती समता दिंडीची सुरुवात केली होती. आज त्यांचेच सुपुत्र श्री शिवाजी एजुकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रा.डॉ.पुरुषोत्तम धोंडगे यांनी त्यांची परंपरा कायम सुरु ठेवली असुन त्यांच्या मार्गदर्शनात नेत्रत्वात दिनांक २२ ते २३ नोव्हेंबर रोजी गुराखी गड तालुका लोहा ते



संत नामदेव महाराज पाथरी व संत चोखाबाराय समाधी मंगळवेडा श्री क्षेत्र पंढरपुर पर्यंत ही भव्य समता दिंडी काढण्यात येते आज ही दिंडी लोहा येथे आली असता माजी आ.तथा लातुर जिल्हा सपर्क प्रमुख रोहीदास चव्हाण यांनी समता दिंडीचे जंगी स्वागत करुन दिंडीतील सर्वांना स्वादिष्ट फराळदिला
यावेळी श्री संत गाडगे महाराज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोकर गवते, मविद्यालयाचे अध्यक्ष व्ही.जी.चव्हाण सर, प्रभारी प्राचार्य संजय जोगदंड, शिक्षक सेनेचे राज्यउपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण सर ,मु.अ.सुरेशराव धोंडगे, मु.अ.अनिल वटटमवार, मु.अ. गोडावार सर, प्रा.गुंडावार सर, प्रा.डॉ. मोहे , हामदे आदीसह मोठया शिक्षक उपस्थीत होते.

## एकीकडे विज्ञान प्रगती करतेय अन् दुसरीकडे माणूस आजारी पडतोय : आयुर्वेदाचार्य डॉ. बढे

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** समतोल योग्य आहार, सकारात्मक



जीवनशैली आणि विहार यात समतोल न ठेवल्यामुळे आज प्रत्येकांना अनेक गंभीर आजारांना सामोरे जावे लागते आहे एकिकडे विज्ञान प्रचंड प्रगती करतोय अन् दुसरीकडे माणूस आजारी पडतोय अशी वास्तव परिस्थिती असल्याचे नमूद करून या बाबतीत आत्तापर्यंत ९ लाख व्यक्त कुटुंबातील व्यक्तिंचे गंभीर आजार प्रिस्टाइने कायमचे दुरूस्त केले असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. प्रवीण बढे यांनी केले.
प्रिस्टाइनचे सर्वेसर्वा तथा एम.डी. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते देवदुत पुरस्कार प्राप्त तसेच अनेक पुरस्काराचे मानकरी असलेले डॉ. प्रवीण बढे हे २० नोव्हें. रोजी झूमवर आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आलेल्या प्रिस्टाइन आयुर्वेद प्रा.लि.च्या राष्ट्रीय मार्गदर्शन चर्चासत्रात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी आपल्या मार्गदर्शनात ते म्हणाले की, प्रिस्टाइनची शुगर, कॅन्सर, बी.पी., ॲसिडिटी, थॉयरॉइड, शुगर ह्रदयविकार, संधीवात, वजन वाढणे, किडनी स्टोन, मूळव्याध, स्त्री विकार, पॅरॅलिसिस, किडनी समस्या, केसांच्या समस्या यासारख्या अनेक आजारांमधून कायमचे बरे व्हायचे असेल तर प्रिस्टाइनचे आयुर्वेदिक प्रोडक्ट हेच रामबाण उपाय आहेत, असे ते म्हणाले.
पुढे ते म्हणाले की, प्रिस्टाइनचे प्रोडक्ट वरील अनेक गंभीर आजारांवर व बदलत्या लाईफस्टाईलवर मात करण्यासाठी आणि आपल्या शरीरातील असंख्य पेशींना नवसंजीवनी देत. स्ट्रेस लेव्हल कमी करते तसेच ब्रेन आणि बॉडी वर कार्य करते. लहान मुलांच्या अनेक समस्यांवर प्रगत आयुर्वेदाच्या आधारे प्रभावी अशा, किड्स्टारची, ह्रदयासाठी हार्टवल ज्युसची तर सर्वोत्तम अंश आरोग्यम बेरी, प्रिस्टा लाईफ, शुगरसाठी डायबोची, तर स्त्रियांसाठी मातृशक्तीची निर्मिती करण्यात आली असल्याचेही त्यांनी नमूद केले.
याच बरोबर केसांचे,डोळ्यांचे, त्वचेचे विकार, स्त्रियांच्या, पुरूषांच्या समस्या, शेतीचा कस वाढून उत्पादनात वाढ करून देणारे आदींच्या बाबतीत मार्गदर्शन करून त्या बाबतीत कोणते प्रोडक्ट वापरले पाहिजेत यासंदर्भात जवळपास दोन ते अडीच तास मार्गदर्शन करून उपस्थितांच्या शंकांचे समाधान कारक निरसनही केले.
या वेळी महाराष्ट्रातील जवळपास सर्वच जिल्ह्यांतील आरोग्याच्या बाबतीत जागरूक असणारे व प्रिस्टाइनचे आरोग्य सल्लागार बहुसंख्य प्रमाणात उपस्थित होते. चर्चासत्राची तांत्रिक बाजू प्रिस्टाइनचे आरोग्य सल्लागार सचिन पवार यांनी पेलून आभार मानले.

# मी समाज बांधवांसोबत : आ.जयकुमार गोरे

## आंदोलनस्थळी गणेश केसकर यांच्याशी भेट

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** अनेक नेत्यांसोबत धनगर आरक्षण संदर्भात माझी चर्चा झाली. सगळे नेते हे या प्रश्नाला कायमच आपली भूमिका मांडत असतात. सकारात्मकतेने विचार करण्यासंदर्भातील भूमिका घेणे अनेक वर्षांपासून चालु आहे.या भूमिकेला न्याय देण्यासाठी जे काही करता येईल ती भूमिका भारतीय जनता पार्टीच्या वतीने फडणवीस साहेब यांच्या कडून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. जोपर्यंत धनगर समाजाला आरक्षण मिळत नाही तोपर्यंत समाजाला एसटी एससीच्या सोई सुविधा कशा पध्दतीने देता येतील याचाही प्रयत्न केला होता. हे तात्पुरती सोल्युशन आहे. कायमचा मार्ग निघण्या संदर्भातील भूमिका घ्यावी, अशी परिस्थिती आहे. समाजबांधवांच्या या मागणी संदर्भात मी समाज बांधवांसोबत आहे. आपली जी मागणी आहे. ती मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री, संबंधित खात्याचे मंत्री यांच्याकडे प्रकर्षाने त्यांच्याशी बोलून घेईन. आपल्या भूमिका त्यांच्या पर्यंत पोहचविण्याचे काम ही जबाबदारी समाजाने माझ्यावर दिलेली आहे. ही जबाबदारी इमानेइतबारे पार पाडू. समाजाच्या प्रश्नासंदर्भात मी आपल्या सगळ्यांचा बंधू म्हणून आपल्या सगळ्यांच्या लढाईमध्ये खांद्याला खांदा लावून ही लढाई आपण सगळे मिळून लढूयात, असे प्रतिपादन आमदार जयकुमार गोरे यांनी केले.



ते लोणंद, ता.खंडाळा येथील गणेश केसकर यांच्या आंदोलनास भेट दिल्यानंतर त्यांनी विश्वास व्यक्त केला. यावेळी राज्यक्रांती शौर्य सेनेच्या अध्यक्षा कल्याणी वाघमोडे, सुजाता दगडे, डॉ.वसंतराव दगडे,माजी सभापती रमेश धायगुडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनील शेळके, माजी नगरसेवक हणमंतराव शेळके, युवा नेते हर्षवर्धन शेळके, सत्वशील शेळके, संदीप शेळके व समाज बांधव उपस्थित होते. गेली सात दिवस सकल धनगर समाज खंडाळा तालुक्याच्या वतीने गणेश केसकर हे आमरण उपोषणास बसलेले आहेत. सातव्या दिवशी सायंकाळच्या दरम्यान आ. जयकुमार गोरे यांनी आंदोलनस्थळी भेट देत उपोषणकर्ते गणेश केसकर यांच्याशी व समाज बांधवांशी संवाद साधला. धनगर आरक्षण प्रश्नी सरकारने जी जी आश्वासने दिलेली आहेत. ती येत्या हिवाळी अधिवेशनात पूर्ण व्हावीत. धनगर समाजाला एसटी आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी. ही मागणी उपोषणकर्ते गणेश केसकर यांनी आमदार जयकुमार गोरे यांच्याकडे मांडली.

आरक्षणा संदर्भात शासनाने जी समिती नेमलेली आहे. त्यात सुद्धा काही दुरुस्ती करण्यात यावी. अशी सूचना गणेश केसकर यांनी मांडली. तसेच जोपर्यंत धनगड चे धनगर दुरुस्तीची शिफारस मिळत नाही. तोपर्यंत उपोषण सुरूच ठेवणार असल्याचे गणेश केसकर यांनी म्हटले. समाज बांधवांच्या भावना सरकारपर्यंत पोहचविण्याचे प्रयत्न आपणही करावेत, असे युवा नेते हर्षवर्धन शेळके यांनी आमदार जयकुमार गोरे यांच्याकडे अपेक्षा व्यक्त केली.

# मेळघाटात आढळल्या ८७ फुलपाखरू प्रजाती

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** मेळघाट व्याघ्र प्रकल्पात नुकत्याच झालेल्या फुलपाखरू सर्वेक्षणात एकूण ८७ फुलपाखरू प्रजातींची नोंद करण्यात आली असून पाच प्रजाती प्रथमच आढळून आल्या आहेत. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त यावर्षी प्रथमच मेळघाट बटरफ्लाय सर्व्हे (मेळघाट फुलपाखरू सर्व्हेक्षण) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हे फुलपाखरू सर्वेक्षण १७ ते २० नोव्हेंबर यादरम्यान पार पडले. शहानूर संकुल येथे झालेल्या कार्यक्रमात सर्वेक्षणाचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मेळघाटच्या क्षेत्रसंचालक जयोती बॅनर्जी तर प्रमुख उपस्थितीत अकोट वन्यजीव विभागाचे उपवनसंरक्षक जयकुमारन, मानद वन्यजीव रक्षक डॉ. जयंत वडतकर आणि प्रा. डॉ सावन देशमुख होते. सर्वेक्षणातून फुलपाखरांची जी माहिती प्राप्त होणार आहे, ती वन्यजीव व्यवस्थापनासाठी उपयुक्त असून ती माहिती सर्व सहभागींच्या ज्ञानातसुद्धा भर पाडणारी ठरेल. त्यामुळे त्या माहितीचा उपयोग जनजागृतीसाठीसुद्धा करण्यात येईल, असे उपवनसंरक्षक जयकुमारन यांनी यावेळी सांगितले. यावेळी मेळघाटातील फुलपाखरांची जैवविविधता व सर्वेक्षण कार्यपद्धती याबाबत सादरीकरण करण्यात आले. या सर्वेक्षणात देशाच्या विविध भागांतून २५ अभ्यासक सहभागी झाले होते, वनविभागाच्या कर्मचाऱ्यांचादेखील या सर्वेक्षणात सहभाग होता. अभ्यासकांना विशिष्ट क्षेत्र निवडून देण्यात आले होते. त्यांनी या क्षेत्रात पायी फिरून फुलपाखरांची नोंद घेतली. मेळघाटात यापूर्वी डॉ. जयंत वडतकर यांनी १३४ फुलपाखरांची नोंद केली होती. सर्वेक्षणादरम्यान ५ प्रथमच आढळून आलेल्या प्रजातींसह ८७ प्रजातींची नोंद झाली.



# आळंद येथे टिपू सुलतान यांची जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**आळंद :** येथील ग्रामपंचायत कार्यालयात हजरत टीपू सुलतान यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी सरपंच कैलास गायके यांनी टीपू सुलतान यांच्या प्रतिमेल पुष्पहार घालून अभिवादन केले. उपसरपंच रामेश्वर चोपडे यांनी त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकले त्यांनी केलेली सामाजिक कामे सांगितली. या प्रसंगी तँटामुक्ति अदयक्ष कौतिक पायगव्हान, माजी चेरमन प्रकाश पायगव्हान, मा.प.स. सदस्य नामदेव पायगव्हान, सुनील तायडे,सोमिनाथ भालेराव, राजू तायडे, समीर पठान, गुलामगौस शेख, माधवराव जाधव, सईद पठाण, मुक्तार शेख, जमील शेख,उस्मान पठाण, समीर शेख, बाळू जमधडे, श्रीकांत भालेराव, गावातील सर्व समाज बांधव हजर होते. कार्यक्रमाचे सूत्र संचलन मौलाना असद यांनी केले.

# उद्योजक मनोज पवार व नाना पटोलेंच्या भेटीने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** युवा उद्योजक मनोज केशवराव पवार यांनी कन्नड-वैजापूर येथील दत्त भक्त परिवारासाठी दत्त यात्रेचे आयोजन केले आहे. ही यात्रा माहूरगड येथे गेली असता २१ रोजी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले आणि मनोज पवार यांची भेट झाली. कन्नड शहरातील तालुक्यातील घडामोडींबद्दल सविस्तर चर्चा झाल्याने तालुक्यात चर्चेला उधान आले आहे. नेमके उद्योजक मनोज पवार करणार काय असाहि प्रश्न पडला आहे. कन्नड नगर परीषदेसाठी त्यांनी चांगलीच कंबर कसली असुन नागरीक, युवा, व्यापारी मंडळांचाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. तसेच मनोज पवार यांचे शिवसेना भाजप राष्ट्रवादी इतर पक्षाशी चांगले संबध असुन त्यात आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि मनोज पवार यांची भेट झाल्याने राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चेला उधान आले आहे. पवार यांना पुढील राजकीय चर्चा करण्यास मुंबईत भेटीसाठी येण्याचे नाना पटोले यांनी निमंत्रित केल्याचे पवार यांच्या निकटवर्तीयांनी सांगितले. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि मनोज पवार यांची माहूरगड झालेली भेट मराठवाड्यातील एका मोठ्या नेत्यानेच घडवून आणल्याची राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. आता मनोज पवार काय करण्यार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.





# भोकरला शहीद टिपू सुलतान जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहीद टिपु सुलतान यांची जयंती शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. येथील मुस्लिम बांधवांनी महात्म फुलेनगर येथील शहीद टिपु सुलतान चौक येथे हजरत शहीद टिपू सुलतान युवक संघटनेच्या वतीने हजरत टिपू सुलतान यांच्या प्रतिमेचे पूजन मौलाना मुबीन खान यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून शहीद टिपु सुलतान सार्वजनीक जयंती मंडळाचे अध्यक्ष बाबा खॉन,निजाम बाबा, जुनेद पटेल, पत्रकार जयभीम पाटील, सय्यद जुनेद छोटेलाल, हमीद खॉ पठान, डॉ. कैलास कानिंदे, मनोज शिंदे, शारू खॉन, नईम करखेलीकर, शेख अर्शत, मुजीब खुरेशी, वकील, रहीम करखेलीकर, सय्यद बाबा, शेख वाजीद, अमिर खॉन, करीम करखेलीकर, अशफाख (अशु), शफी पटेल याची उपस्थिती होती. पोलीस निरीक्षक नानासाहेब उबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी दिलीप जाधव, विकास राठोड यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.



# पॅरामोटोरिंगचा आनंद



खा. सुप्रिया सुळे यांनी जेजुरी येथे येतील फ्लाईंग रायनो पॅरामोटरिंगचा आनंद लुटला सुमारे ८00फूट जयाद्रीच्या जेजुरी गडाच्या दर्शनाचा आनंद घेतला मान्यता प्राप्त असलेल्या फ्लाईंग रायनो पेरा मोटरिंग साहसी खेळाचा एक वेगळा अनुभव सुप्रियाताई सुळे यांनी घेतला. आठशे जयाद्रीच्या डोंगरदऱ्या जेजुरी गडाचे व्यंग दृश्य समाधान व्यक्त केले प्रख्यात अशा पर्यटनस्थळ ठिकाणी हा अनोखा तंत्रज्ञानाचा प्रयोग प्रचंड आनंद देऊन गेला. सुप्रिया ताई यांनी दिल्या सुमारे दहा मिनिटे या खेळाचा आनंद लुटला.

# राज्यपाल बैस यांच्या हस्ते रुग्णवाहिकेचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** महाराष्ट्राचे राज्यपाल मंगळवार दि. २१ रोजी इगतपुरी तालुक्यातील मोडाळे, शिरसाठे, कुशेगाव येथे पाहणी दौरा करण्यासाठी आले होते. यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस गोरख बोडके यांचे अथक प्रयत्न आणि लायन्स क्लब जुहू यांच्या सहकार्याने इगतपुरी तालुक्यासाठी मोफत रुग्णसेवेसाठी सुसज्ज रुग्णवाहीकेचे लोकार्पण राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते करण्यात आले. मोडाळे येथे महाराष्ट्राचे महामहिम राज्यपाल रमेश बैस यांनी राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस गोरख बोडके यांच्याकडे रुग्णवाहिकेची चावी सोपवली. ह्या रुग्णवाहिकेच्या माध्यमातून इगतपुरी तालुक्यातल्या तळागाळातील गोरगरीब नागरिकांना अत्यावश्यक आरोग्य सेवा वेळेत मिळण्यास बहुमोल हातभार लागणार असुन ही सेवा मोफत असणार आहे. यावेळी राज्यपाल रमेश बैस यांनी गोरख बोडके यांच्या कार्याचे कौतुक केले. लोकार्पण कार्यक्रमावेळी विधानसभा उपाध्यक्ष ना. नरहरी झिरवाळ, नाशिकचे पालकमंत्री ना. दादाजी भुसे, इगतपुरीचे आमदार हिरामण खोसकर, माजी आमदार शिवराम झोले, घोटी बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर लहाने, संचालक सुनील जाधव, सामाजिक कार्यकर्ते तुकाराम वारघडे आदी मान्यवर उपस्थित होते. रुग्णवाहीकेचा फायदा इगतपुरी तालुक्यातील गोरगरीब नागरिकांना मिळणार असून यामुळे अनमोल जीव वाचवण्यासाठी योगदान मिळणार आहे. याबद्दल गोरख बोडके आणि लायन्स क्लब यांचे विशेष कौतुक विधानसभा उपाध्यक्ष ना. नरहरी झिरवाळ, नाशिकचे पालकमंत्री ना. दादाजी भुसे यांनी केले. गोरख बोडके यांच्या या उपक्रमाचे तालुक्यातुन कौतुक होत आहे.

# पाणंद रस्ते करण्याच्या घोषणेवर विरजण

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगीसह ठिकठिकाणची मंजूर पाणंद रस्ते करण्याच्या घोषणेनंतर शेतकरी व नागरिक ये जासाठी धड रस्ता मिळेल यामुळे खुश होते. परंतु त्यावर विरजन पडले व ती केवळ कागदी घोषणा ठरली लाभार्थी उपेक्षित राहुनही ते त्या रस्ता कामाची अपेक्षा करत असल्याचे चित्र आहे. वर्ष २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात गावोगावी पाणंद रस्त्यांच्या कामाची घोषणा झाली ते रस्ता काम पंचायत समिती स्तर ग्रामपंचायत अंतर्गत कामे हाती घेणार होते तर ठिक ठिकाणी ग्रामसभेतून त्याचे वाचण ही झाले तद्नंतर त्याची जायमोक्यावर पाहणी ही झाली.मात्र काही शेजारी पाजारी शेतकऱ्यांची तक्रारी अडथळे अडचणी निर्माण झाल्या प्रकरण तहसीलदार पर्यंतही गेले त्यांनीही पाहणी करून रस्ता करण्याचा विश्वास दिला. परंतु रस्ते आनंत अडचणी नंतर जैसे थे पडून आहे. शेतकऱ्यांना व नागरिकांना रस्त्याची गरज असल्याने त्यांनी त्यांच्या स्तरावर वर्गणी करुन पुरता पुरती रस्ते करून ये जा सुरु ठेवली परंतु महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत पाणंद रस्ते न केल्याने शेतकरी नागरिकात शासन प्रशासन विरोधात नारजी आहे. गाजावाजा ग्रामसभेत कागदोपत्री दैनिकात, प्रत्यक्ष मात्र पाणंद रस्ते घोषणा व कागदावरच असल्याने नागरिकांचा विशेष करुन पावसाळ्यात व तदनंतर दैनंदिन त्रास जैसे थे असल्याचे चित्र असुण वरिष्ठ कार्यालय तथा अधिकाऱ्यांनी यात लक्ष घालून नियोजित कामे न होण्याचे कारण तथा हलगर्जीपणा कामात टाळाटाळ बद्दल कारवाई करुन तातडीने पाणंद रस्ते करावे.

# ओबीसींना गुलाम बनवण्याचा डाव उधळून लावा

## डॉ. बी. डी.चव्हाण : भोकरला ओबीसी बैठकीस प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** संविधानाने दिलेले हक्काचा आरक्षण प्रस्थापित समाजाकडून हिसकावून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे.ओबीसीच्या मुलावर भावी काळात मोठे संकट येणार आहे. ओबीसींनी आता जात धर्म बाजूला ठेवून ओबीसीचे आरक्षण वाचवण्यासाठी संघटित होणे गरजेचे आहे. त्याचा डाव उधळून लावा असे अहवान बंजारा समाजाचे नेते डॉ.बी. डी.चव्हाण यानी बुधवारी (ता.२२ ) केले आहे. संविधानदिनी रविवारी (ता.२६) हिंगोली येथे होणाऱ्या ओबीसी महामेळाव्याच्या संदर्भात नारवाट शिवारातील गुड्डा महादेव परिसरात बैठक घेण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. लिंगायत समाजाचे जेष्ठ नागरिक चेअरमन रामराव देशमुख अध्यक्षतेस्थानी होते. श्री.चव्हाण म्हणाले की ,डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात दलित, आदिवासी, ओबीसींनाही हक्काचं आरक्षण दिलं परंतु प्रस्थापित समाजाच्या मनात हे आरक्षण खूपत आहे. गरीब मराठ्यांना आरक्षण देण्यास आमचा विरोध नाही पण त्यांनी आमच्या ताटातलं आरक्षण घेऊ नये. हिंगोली येथे होणाऱ्या ओबीसीच्या महामेळाव्यास सर्व ओबीसी बांधव,बाराबलूतेदारानी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले या वेळी ओबीसी नेते नामदेव आयलवाड, डॉ.उत्तम जाधव,नागोराव शेंडगे यांनीही ओबीसी मध्ये होणारी घुसखोरी रोखण्यासाठी सर्वांनी संघटित होण्याचे आवाहन केले. अध्यक्षीय समारोप करतांना रामराव देशमुख म्हणाले आपण कुठे ही रहा पण लक्ष एक च ठेवा ते म्हणजे ओबीसी सर्व एक होण्याचे आवाहन केले.प्रस्ताविक भाषण बी.आर. पांचाळ यांनी केले तर सूत्रसंचालन आंबादास अटपलवार यांनी केले या बैठकीस डॉ.राम नाईक, हरिदत्त हाके, नागनाथ गौड पाटील, संतोष आलेवार, सुरेश बिल्लेवाड, साई राठोड, राजू आंगरवार, सुभाष नाईक, प्रकाश राठोड, माधव अमृतवाड, राजेश करपे, संदीप गौड, चंद्रकांत मुस्तापुरे, पांडुरंग वर्षेवार, मोहन राठोड सुभाष नाईक, पप्पू बोलेवार, रमेश महागावकर, साई राठोडसह कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर